**महाराष्ट्र शासन**

धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे कार्यालय,
धर्मादाय आयुक्त भवन,
२ रा मजला, सास्मीरा इमारत, सास्मीरा मार्ग,
वरळी, मुंबई-४०० ०३०.
दूरध्वनी क्रमांक ०२२-२४९७६४२२, २४९३५४३४, २४९३०४९९
E-mail ID-supdtest.mum-mh@gov.in

संदर्भ क्र. आस्था/निरी-१/स.से/४५१८/२०२५ दि. ०९/०९/२०२५

**धर्मादाय संघटनेच्या आस्थापनेवरील गट- ब (अराजपत्रित) व गट- क संवर्गातील रिक्त पदे सरळसेवा प्रवेशाने भरण्यासाठी जाहिरात क्र. ०१/२०२५**

धर्मादाय संघटनेच्या आस्थापनेवरील गट- ब (अराजपत्रित) व गट- क संवर्गातील रिक्त पदे सरळसेवा प्रवेशाने भरण्यासाठी जाहिरात प्रसिध्द करण्यात येत आहे. भरती प्रक्रियेत तुलनात्मक स्पर्धा होण्यासाठी पुरेसे उमेदवार असणे आवश्यक आहे.त्यामुळे सदर निवेदनाद्वारे कळविण्यात येते की, जाहिरातीनुसार गट- ब (अराजपत्रित) व गट- क मधील एकूण १७९ पदांकरीता अर्ज करण्याचा कालावधी दि.११/०९/२०२५ ते दि.०३/१०/२०२५ पर्यंत आहे. जाहिरातीत नमूद केल्याप्रमाणे शैक्षणिक अर्हता व इतर बाबींची पूर्तता करणाऱ्या पात्र व इच्छुक उमेदवारांनी धर्मादाय संघटनेच्या https://charity.maharashtra.gov.in या अधिकृत संकेतस्थळावरील उपलब्ध लिंकव्दारे दि. ०३/१०/२०२५ रोजी रात्री २३:५५ वाजेपर्यंत ऑनलाईन पध्दतीने अर्ज करावेत, विविध संवर्गातील भरावयाच्या पदांचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | संवर्ग | पदनाम | ७ व्या वेतन आयोगानुसार वेतनश्रेणी | | भरावयाची एकूण पदे |
|---|---|---|---|---|---|
| १ | गट-ब (अराजपत्रित) | विधि सहायक | एस- १५ | ४१८००-१३२३०० | ०३ |
| २ | गट-ब (अराजपत्रित) | लघुलेखक (उच्च श्रेणी) | एस-१६ | ४४९००- १४२४०० | ०२ |
| ३ | गट-ब (अराजपत्रित) | लघुलेखक (कनिष्ठ श्रेणी) | एस- १५ | ४१८००-१३२३०० | २२ |
| ४ | गट- क | निरीक्षक | एस-१३ | ३५४००-११२४०० | १२१ |
| ५ | गट- क | वरिष्ठ लिपिक | एस-८ | २५५००-८११०० | ३१ |
| | | एकूण | | | १७९ |

ऑनलाईन अर्ज भरण्यासाठी वेळापत्रक

| अ.क्र. | तपशील | विहित कालावधी |
|---|---|---|
| १ | अर्ज सादर करावयाचा कालावधी. | दि. ११/०९/२०२५ ते ०३/१०/२०२५ |
| २ | ऑनलाईन पद्धतीने विहित परीक्षा भरण्याकरीता अंतिम दिनांक | ०३/१०/२०२५ |
| ३ | परीक्षेसाठी ऑनलाईन प्रवेशपत्र उपलब्ध होण्याचा दिनांक | धर्मादाय संघटनेच्या अधिकृत संकेतस्थळावर परीक्षा दिनांकाच्या ०७ दिवस अगोदर उपलब्ध असेल- https://charity.maharashtra.gov.in |
| ४ | ऑनलाईन परीक्षेचा दिनांक (प्रवेश पत्रता नमुद केल्यानुसार) | ऑक्टोबर - नोव्हेंबर २०२५ |
| ५ | तांत्रिक समस्या उद्भवल्यास हेल्पलाइन नंबर | ७९९६०६५८८८ |
| ६ | जाहिरातीमधील बाबीसंबधी विचारणा | occheadoffice@gmail.com |

| | | |
|---|---|---|
| | करण्यासाठी हेल्पलाईन नंबर व ई- मेल आयडी | ०२२-२४९७६४२२, २४९३५४३४, २४९३०४९९ |

परिक्षेचा दिनांक, वेळ, केंद्र इ.बाबी प्रवेशपत्रामध्ये नमूद केल्या जातील. संभाव्य बदलाबाबत वेळोवेळी धर्मादाय संघटनेच्या https://charity.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर माहिती प्रसिध्द करण्यात येईल.

**परीक्षा शुल्क**:-

| आकारण्यात येणारे शुल्क | |
|---|---|
| खुला | मागास प्रवर्ग व अनाथ प्रवर्ग |
| रु. १,०००/- | रु. ९००/- |

१. माजी सैनिक व दिव्यांग माजी सैनिक यांचेसाठी शुल्क माफ राहील.

२. फक्त ऑनलाईन पध्दतीनेच परीक्षा शुल्क भरावयाचे आहे.

३. उमेदवारास प्रसिध्द केलेल्या जाहिरातीमधील एकापेक्षा अधिक पदाकरीता अर्ज करावयाचे असल्यास अशा प्रत्येक पदासाठी स्वतंत्र अर्ज सादर करुन त्यासाठी स्वतंत्र परीक्षा शुल्कभरणे बंधनकारक राहील.

४. परीक्षा शुल्क ना परतावा (Non- Refundable) आहे. ऑनलाईन शुल्क भरतांना बँकेचे इतर शुल्क उमेदवाराला स्वतः भरावे लागतील. कोणत्याही कारणास्तव पदभरती प्रक्रिया स्थगित अथवा रद्द झाल्यास उमेदवारास पदभरती शुल्क परत करण्यात येणार नाही.

५. ऑनलाईन अर्ज करण्याची पध्दत इत्यादी बाबतचा तपशिल व ऑनलाईन अर्ज करण्यासाठी धर्मादाय संघटनेच्या संकेतस्थळावर भेट देण्यात यावी. तसेच संवर्गनिहाय भरावयाची पदे, पदांचा तपशिल, वेतनश्रेणी, वयोमर्यादा, वयोमर्यादेमध्ये शिथिलता, निवड पध्दत, सर्वसाधारण सूचना, अटी व शर्ती, शैक्षणिक अर्हता, सामाजिक व समांतर आरक्षण तसेच आरक्षणाबाबत तरतुदी, पदनिहाय ऑनलाईन परीक्षा शुल्क, अर्ज भरणेबाबत मार्गदर्शक सूचना इत्यादी बाबतचा तपशिल https://charity.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

०३/०३/२५

(अमोघ श्या. कलोती)
धर्मादाय आयुक्त,
महाराष्ट्र राज्य, मुंबई

**भरावयाची पदे:**

**१. विधि सहायक: (एकूण ०३ पदे) गट ब (अराजपत्रित) वेतनश्रेणी:- (एस १५ :-४१८००-१३२३००)**

| प्रवर्ग | अ.जा | अ. ज. | वि. जा. (अ) | भ. ज (ब) | भ.ज (क) | भ.ज (ड) | इ. मा. व. | वि.मा.प्र. | सा. आणि शै. मागास वर्ग | आ.दु.घ. | एकूण आरक्षित पदे | अराखीव पदे | एकूण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| पदसंख्या | ०१ | -- | ०१ | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | ०२ | ०१ | ०३ |
| रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय सामाजिक/समांतर आरक्षणाचे विवरणपत्र खालीलप्रमाणे आहे :- | | | | | | | | | | | | | |
| (१) सर्वसाधारण | ०१ | -- | ०१ | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | ०२ | ०१ | ०३ |
| (२) महिला | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| (३) खेळाडू | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| (४) दिव्यांग | -- | | | | | | | | | | | | |
| (५) अनाथ | -- | | | | | | | | | | | | |

**अर्हता व पात्रता :-**

१.सांविधिक विद्यापिठाची विधि मधील पदवी किंवा तिच्याशी समतुल्य असल्याचे शासनाने घोषित केलेली इतर कोणतीही अर्हता.

२.खाजगी किवा शासकीय कार्यालयांमधील धर्मादाय संघटनेशी संबंधित काम करण्याचा तीन वर्षाचा अनुभव असणारा उमेदवार.

**२. लघुलेखक उच्च श्रेणी : (एकूण ०२ पदे) गट ब (अराजपत्रित) वेतनश्रेणी:- (एस:१६- ४४९००-१४२४००)**

| प्रवर्ग | अ.जा | अ.ज. | वि.जा. (अ) | भ.ज (ब) | भ.ज (क) | भ.ज (ड) | इ.मा. व. | वि.मा.प्र. | सा. आणि शै. मागास वर्ग | आ.दु.घ. | एकूण आरक्षित पदे | अराखीव पदे | एकूण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| पदसंख्या | -- | -- | -- | -- | -- | -- | ०१ | -- | ०१ | -- | ०२ | -- | ०२ |
| रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय सामाजिक/समांतर आरक्षणाचे विवरणपत्र खालीलप्रमाणे आहे :- | | | | | | | | | | | | | |
| (१) सर्वसाधारण | -- | -- | -- | -- | -- | -- | ०१ | -- | ०१ | -- | ०२ | -- | ०२ |
| (२) महिला | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| (३) खेळाडू | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| (४) दिव्यांग | -- | | | | | | | | | | | | |
| (५) अनाथ | -- | | | | | | | | | | | | |

**अर्हता व पात्रता :-**

१. माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण.

२. लघुलेखनाचा वेग किमान १२० शब्द प्रती मिनिट आणि इंग्रजी टंकलेखनाचा वेग किमान ४० शब्द प्रती मिनिट किंवा मराठी टंकलेखनाचा वेग ३० शब्द प्रती मिनिट अर्हतेचे शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र धारण केलेले असावे.

| ३. लघुलेखक कनिष्ठ श्रेणी : (एकूण २२ पदे) गट ब (अराजपत्रित) वेतनश्रेणी:- (एस-१५ : ४१८००-१३२३००) | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **प्रवर्ग** | **अ. जा** | **अ.ज.** | **वि.जा. (अ)** | **भ.ज (ब)** | **भ.ज (क)** | **भ.ज (ड)** | **इ.मा. व.** | **वि.मा. प्र.** | **सा. आ णि शै. मागा सवर्ग** | **आ.दु. घ.** | **एकूण आर क्षित पदे** | **अरा खीव पदे** | **एकू ण पदे** |
| पदसंख्या | ०४ | ०४ | -- | ०१ | ०२ | ०२ | ०३ | -- | ०३ | ०३ | २२ | -- | २२ |
| रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय सामाजिक/समांतर आरक्षणाचे विवरणपत्र खालीलप्रमाणे आहे :- | | | | | | | | | | | | | |
| (१) सर्वसाधारण | ०३ | ०३ | -- | ०१ | ०१ | ०२ | ०२ | -- | ०२ | ०२ | १६ | -- | १६ |
| (२) महिला | ०१ | ०१ | -- | -- | ०१ | -- | ०१ | -- | ०१ | ०१ | ०६ | -- | ०६ |
| (३) खेळाडू | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| (४) दिव्यांग | ०१ पद (अल्पदृष्टी) (Low Vision) | | | | | | | | | | | | |
| (५) अनाथ | -- | | | | | | | | | | | | |
| | **अर्हता व पात्रता** :- | | | | | | | | | | | | |
| | १. माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण. | | | | | | | | | | | | |
| | २. लघुलेखनाचा वेग किमान १०० शब्द प्रती मिनिट आणि इंग्रजी टंकलेखनाचा वेग किमान ४० शब्द प्रती मिनिट किंवा मराठी टंकलेखनाचा वेग ३० शब्द प्रती मिनिट अर्हतेचे शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र धारण केलेले असावे. | | | | | | | | | | | | |

| ४. निरीक्षक : (एकूण १२१ पदे) गट क वेतनश्रेणी:- (एस १३ :-३५४००-११२४००) | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **प्रवर्ग** | **अ. जा** | **अ. ज.** | **वि. जा. (अ)** | **भ. ज (ब)** | **भ. ज (क )** | **भ.ज (ड)** | **इ.मा. व.** | **वि.मा. प्र.** | **सा. आ णि शै. मागा स वर्ग** | **आ.दु. घ.** | **एकूण आर क्षित पदे** | **अरा खीव पदे** | **एकू ण पदे** |
| पदसंख्या | १३ | ७ | ४ | ३ | ५ | २ | १८ | २ | १५ | १५ | ८४ | ३७ | १२१ |
| रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय सामाजिक/समांतर आरक्षणाचे विवरणपत्र खालीलप्रमाणे आहे :- | | | | | | | | | | | | | |
| (१) सर्वसाधारण | ०४ | ०३ | ०२ | ०२ | ०२ | ०१ | ०६ | ०१ | ०६ | ०५ | ३२ | ११ | ४३ |
| (२) महिला | ०४ | ०२ | ०१ | ०१ | ०१ | ०१ | ०५ | ०१ | ०४ | ०५ | २५ | ११ | ३६ |
| (३) खेळाडू | ०१ | -- | -- | -- | -- | -- | ०१ | -- | ०१ | ०१ | ०४ | ०२ | ०६ |
| (४) माजी सैनिक | ०२ | ०१ | ०१ | -- | ०१ | -- | ०३ | -- | ०२ | ०२ | १२ | ०६ | १८ |
| (५) पदवीधर अंशकालीन कर्मचारी | ०१ | ०१ | -- | -- | ०१ | -- | ०२ | -- | ०१ | ०१ | ०७ | ०४ | ११ |
| (६) भूकंपग्रस्त | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | ०१ | ०१ |
| (७) प्रकल्पग्रस्त | ०१ | -- | -- | -- | -- | -- | ०१ | -- | ०१ | ०१ | ०४ | ०२ | ०६ |
| (८) दिव्यांग | एकूण – ०५ पदे (०२ पदे – अंध/ अल्पदृष्टी (Blind/ Low Vision). ०२ पदे – (Hearing Handicapped) ०१ पद (OL, OA, BL, OAL, LC, DW, AAV) | | | | | | | | | | | | |
| (९) अनाथ | ०१ पद (संस्थात्मक या प्रवर्गाकरीता राखीव) | | | | | | | | | | | | |
| | **अर्हता व पात्रता** :- | | | | | | | | | | | | |
| | १.उमेदवाराने पदवी किंवा पदवीपेक्षा इतर कोणतीही उच्च अर्हता धारण केलेली असावी. | | | | | | | | | | | | |

| ५. वरिष्ठ लिपिक:- (एकूण पदे ३१) गट - क वेतनश्रेणी:- (एस ८ :-२५५००-८११००) | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| प्रवर्ग | अ.जा | अ.ज. | वि.जा.(अ) | भ.ज (ब) | भ.ज (क) | भ.ज (ड) | इ.मा.व. | वि.मा.प्र. | सा. आणि शै. मागास वर्ग | आ.दु.घ. | एकूण आरक्षित पदे | अराखीव पदे | एकूण पदे |
| पदसंख्या | ०४ | ०२ | ०१ | ०१ | ०१ | ०१ | ०६ | ०१ | ०४ | ०४ | २५ | ०६ | ३१ |
| रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय सामाजिक/समांतर आरक्षणाचे विवरणपत्र खालीलप्रमाणे आहे :- | | | | | | | | | | | | | |
| (१) सर्वसाधारण | ०२ | ०१ | ०१ | ०१ | -- | ०१ | ०२ | ०१ | ०२ | ०२ | १३ | ०२ | १५ |
| (२) महिला | ०१ | ०१ | -- | -- | ०१ | -- | ०२ | -- | ०१ | ०१ | ०७ | ०२ | ०९ |
| (३) खेळाडू | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| (४) माजी सैनिक | ०१ | -- | -- | -- | -- | -- | ०१ | -- | ०१ | ०१ | ०४ | ०१ | ०५ |
| (५) पदवीधर अंशकालीन कर्मचारी | -- | -- | -- | -- | -- | -- | ०१ | -- | -- | -- | ०१ | ०१ | ०२ |
| (६) भूकंपग्रस्त | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| (७) प्रकल्पग्रस्त | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| (८) दिव्यांग | एकूण – ०२ पदे (०१ पदे – अंध/ अल्पदृष्टी (Blind/ Low Vision). ०१ पद – कर्णबधीरता अथवा ऐकू येण्याकरिता दुर्बलता (Deaf/ Hard Hearing) | | | | | | | | | | | | |
| (९) अनाथ | -- | | | | | | | | | | | | |
| | **अर्हता व पात्रता:-** | | | | | | | | | | | | |
| | १.उमेदवाराने पदवी किंवा पदवीपेक्षा इतर कोणतीही उच्च अर्हता धारण केलेली असावी . | | | | | | | | | | | | |
| | २.उमेदवाराने इंग्रजी टंकलेखनात ४० शब्द प्रती मिनिट किंवा यथास्थिती मराठी टंकलेखनात ३० शब्द प्रती मिनिट पेक्षा कमी नसेल इतक्या गतीचे शासकीय व्यावसायिक प्रमाणपत्र धारण केलेले असावे. | | | | | | | | | | | | |

**१. सर्वसाधारण सूचना :-**

| | |
|---|---|
| १ | **वर नमूद केलेल्या पदसंख्या व आरक्षणांमध्ये वाढ, घट अथवा बदल होण्याची शक्यता आहे.** |
| २ | उपरोक्त नमूद संवर्गातील पदासाठी ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करण्यापूर्वी उमेदवारांनी स्वतः खात्री करावयाची आहे की, ते अर्ज करीत असलेल्या पदासाठी विहित अर्हता/अटींची पूर्तता करीत असून सदर पदाकरिता ते पात्र आहेत. |
| ३ | **ऑनलाईन पध्दतीने अर्ज करण्यासाठी उमेदवाराकडे नियमित वापरात असलेला वैध (Valid) ई-मेल आयडी व भ्रमणध्वनी (Mobile No.) असणे आवश्यक आहे.** भरती प्रक्रिया परीक्षेचे प्रवेशपत्र तसेच इतर महिती वेळोवेळी ऑनलाईन पध्दतीने देण्यात येणार असल्याने भरती प्रक्रियेच्या पूर्ण कालावधीमध्ये सदर ई-मेल आयडी व भ्रमणध्वनी वैध राहणे आवश्यक आहे. |
| ४ | अराखीव (खुला) पदांकरीता सर्व उच्च गुणवत्ताधारक उमेदवारांचा (मागासवर्ग उमेदवारांसह) विचार केला जात असल्याने सर्व उमेदवारांनी त्यांच्या प्रवर्गासाठी पद आरक्षित/उपलब्ध नसले, तरी अर्जामध्ये त्यांच्या मूळ जात प्रवर्गाची माहिती अचूकपणे नमूद करणे बंधनकारक आहे. |
| ५ | संबंधित पदाच्या/परीक्षेच्या जाहिरात/अधिसूचनेमध्ये दिलेल्या सर्व सूचनांचे काळजीपूर्वक अवलोकन करुनच अर्ज सादर करावा. अर्जामध्ये दिलेल्या माहितीच्या आधारेच पात्रता ग्राह्य धरली जाईल व त्याच्या आधारे निवड प्रक्रिया पूर्ण होईल. |
| ६ | **अर्जातील माहिती/तपशील तसेच अर्जासोबत अर्हते/पृष्ठतेसंलग्न उमेदवारांने योग्य कागदपत्र सादर केली आहेत यास अधिन राहून संबंधित उमेदवारास परीक्षेस बसण्यासाठी विचारधीन करण्यात येईल. त्यामुळे उमेदवारास सदर परीक्षेअंती किमान गुण प्राप्त झाले तरी परीक्षा संबंधित पदाची आवश्यक शैक्षणिक व इतर अर्हता संलग्न कागदपत्राच्या पडताळणीअंती संबंधित उमेदवार शिफारस/निवडीस पात्र होईल. त्यामुळे उमेदवारांनी पात्रतेच्या अटी अभ्यासूनच अर्ज सादर करण्याची दक्षता घ्यावी व अर्ज करावा.** |

| | |
|---|---|
| ७ | नावामध्ये बदल केलेला असल्यास विवाह निबंधक यांनी दिलेला दाखला (विवाहीत स्त्रियांच्या बाबतीत), नावात बदल झाल्या संबंधित अधिसूचीत केलेले राजपत्र किंवा राजपत्रित अधिकारी यांच्याकडून नावात बदल झाल्या संबंधिचा दाखला व त्याची छायांकित प्रत परीक्षेच्या वेळेस सादर करणे आवश्यक आहे. |
| ८ | पत्रव्यवहारासाठी स्वतःच्या पत्ता इंग्रजीमध्येच लिहावा. व्यावसायिक मार्गदर्शन केंद्र, स्वयं अध्ययन मार्गदर्शन केंद्र/वर्ग अथवा तत्सम स्वरुपाच्या कोणत्याही मार्गदर्शन केंद्राचा/संस्थेचा पत्ता पत्रव्यवहारासाठी देवू नये. |
| ९ | **अर्जामध्ये दिलेली माहिती व मूळ कागदपत्रे तपासणी दरम्यान काही कागदपत्रे संशयास्पद वाटली अथवा सादर केलेल्या कागदपत्रांतील माहिती व मूळ अर्जातील माहिती यामध्ये फरक आढळून आल्यास अर्जामध्ये भरलेली माहिती खोटी आहे असे समजण्यात येईल. आवश्यकतेनुसार मूळ शैक्षणिक/इतर कागदपत्रांची संबंधित शैक्षणिक विद्यापीठ/संस्था यांच्याकडे तपासणी करण्यात येईल. तसेच उमेदवार अर्जामधील माहिती संदर्भातील कागदोपत्री पुरावे सादर करु न शकल्यास उमेदवाराची निवड रद्द करण्यात येईल.** |
| १० | वय, शैक्षणिक अर्हता, मागासवर्ग/नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र, दिव्यांग, महिला, माजी सैनिक, अनाथ, प्रकल्पग्रस्त, भूकंपग्रस्त, अशंकालीन कर्मचारी, खेळाडू, अनुभव पात्रता व ज्या दिव्यांग उमेदवारास लेखनिक द्यावयाचा आहे इत्यादी बाबत अर्जामध्ये स्पष्टपणे/निर्विवादपणे दावा करणे आवश्यक आहे. अर्जातील संबंधित रकान्यात स्पष्टपणे दावा केला नसल्यास, संबंधित दाव्याचा विचार केला जाणार नाही. उमेदवाराने अर्ज सादर केल्यानंतर त्यामध्ये कोणत्याही प्रकारचा बदल करता येणार नाही. |
| ११ | ज्या उमेदवारांनी यापूर्वी त्यांचे नाव रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्राकडे, सेवायोजन कार्यालय/समाज कल्याण/आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी/जिल्हा सैनिक बोर्ड/दिव्यांग कल्याण कार्यालय इ. कार्यालयात नोंदविलेले आहे, अशा उमेदवारांनी देखील स्वतंत्ररित्या ऑनलाईन अर्ज सादर करणे आवश्यक राहील. तसेच प्रकल्पग्रस्त, अशंकालीन इत्यादी समांतर आरक्षणांतर्गत येणाऱ्या उमेदवारांनी स्वतंत्रपणे अर्ज ऑनलाईन सादर करणे आवश्यक आहे. |
| १२ | प्रस्तुत जाहिरातीस अनुसरुन अर्ज सादर करण्यासाठी विहीत केलेल्या अंतिम दिनांकास संबंधित शैक्षणिक अर्हता धारण करणे आवश्यक आहे. |
| १३ | प्राप्त अर्जाच्या संख्येचा विचार करुन निवड प्रक्रियेचे स्वरुप ठरविण्याचे अधिकार धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई व निवड समिती यांना राहील. |
| १४ | नोंदणी व अर्ज भरण्याची प्रक्रिया उमेदवाराने स्वतः करणे आवश्यक आहे. |
| १५ | अर्ज इंग्रजीमध्ये उपलब्ध करुन देण्यात आला आहे. संक्षिप्तपणे (Abbreviations) वा अद्याक्षरे (Initials) न देता संपूर्ण नाव व संपूर्ण पत्ता नमूद करावा. नावाच्या/पत्त्याच्या दोन भागांमध्ये एक स्पेसने (जागा) सोडावी. |
| १६ | एस. एस. सी. अथवा तत्सम प्रमाणपत्रांवरील नावाप्रमाणे अर्ज भरावेत त्यांनतर नाव बदलेले असल्यास अथवा प्रमाणपत्रावरील नावात कोणत्याही प्रकारचा बदल झाला असल्यास, त्यासंबंधीच्या बदलासंदर्भात विहित प्रमाणपत्रे/कागदपत्रे पडताळणीच्या वेळी सादर करावी. |
| १७ | उमेदवाराने शाळा सोडल्याचा दाखला, जन्मदाखला, अधिवास प्रमाणपत्र, अर्हतेमध्ये नमूद केलेले विहित शैक्षणिक अर्हतेबाबतची गुणपत्रके व प्रमाणपत्रे, मराठी व इंग्रजी भाषेचे विहित गतीचे टंकलेखनाचे प्रमाणपत्र व संगणक ज्ञानाचे एमएसीआयटी प्रमाणपत्र तसेच मागणवर्ग उमेदवारांनी सक्षम अधिकाऱ्याने दिलेले जात प्रमाणपत्र, जात वैधता प्रमाणपत्र आणि अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती प्रवर्ग वगळता अन्य सर्व मागास प्रवार्गातील उमेदवारांनी ते उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे नवीनतम प्रमाणपत्र, इत्यादी सर्व कागदापत्रांच्या मूळ प्रती व साक्षांकित प्रती, तसेच उमेदवाराची समांतर आरक्षणातर्गत निवड झाली असल्यास, शासन निर्णयानुसार विहीत प्रमाणपत्रांच्या साक्षांकित प्रती सादर करणे आवश्यक असेल. |
| १८ | संबंधित पदाच्या /परीक्षेच्या जाहिरात/सूचनेमध्ये दिलेल्या सर्व सूचनाचे काळजीपूर्वक अवलोकन करुनच अर्ज सादर करावा. अर्जामध्ये दिलेल्या माहितीच्या आधारेच पात्रता आजमावली जाईल व त्याच्या आधारे निवड प्रक्रिया पूर्ण होईल. |
| १९ | महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशास विभाग, शासन निर्णय दिनांक २० मे २०११ अन्वये जे उमेदवार १० वी/१२ वी (माध्यमिक/उच्च माध्यमिक परीक्षा) उत्तीर्ण न होता यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ व इतर मुक्त |

| | |
|---|---|
| | विद्यापीठ ज्यांना शासन निर्णय दिनांक १० डिसेंबर १९९८ अन्वये विद्यापीठ अनुदान आयोगाची (UGC) मान्यता प्राप्त आहे. अशा मुक्त विद्यापीठातून पदवी धारण करणाऱ्या उमेदवारांना "निरीक्षक" व "वरिष्ठ लिपिक" या पदाकरीता अर्ज करता येईल. तसेच ज्या पदांच्या सेवाप्रवेश नियमात १० वी/ १२ वी (माध्यमिक/उच्च माध्यमिक परीक्षा) परीक्षा उत्तीर्ण असणे अशी किमान अर्हता विहित केलेली असेल त्या बाबतीत महाराष्ट्र राज्य शिक्षण मंडळाची **माध्यमिक व उच्च माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण नसलेला मात्र यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाची** पूर्व परीक्षा उत्तीर्ण होऊन पदवी परीक्षेचे प्रथम वर्ष उत्तीर्ण झालेला वा यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठातून पदवी धारण केलेला आहे अशा उमेदवारांना दहावी उत्तीर्ण अर्हता आवश्यक असणाऱ्या पदाकरिता अर्ज करता येईल. |
| २० | शासन निर्णय क्रमांक : आरजीडी-१५११/प्र.क्र.८९/१३, दिनांक २० मे २०१९ अन्वये यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ, नाशिक व राष्ट्रीय मुक्त विद्यालय शिक्षण संस्था, नवी दिल्ली यांची प्रमाणपत्रे शासन सेवेसाठी समकक्ष म्हणून विचारात घेणेबाबत निर्देश आहेत. त्यानुसार सेवाप्रवेश नियमात १० वी/ १२ वी (माध्यमिक/उच्च माध्यमिक परीक्षा) परीक्षा उत्तीर्ण असणे अशी किमान अर्हता विहित केलेली असेल त्या बाबतीत महाराष्ट्र राज्य शिक्षण मंडळाची माध्यमिक व उच्च माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण नसलेला मात्र यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाची पूर्व परीक्षा उत्तीर्ण होऊन पदवी परीक्षेचे प्रथम वर्ष उत्तीर्ण झालेला व यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठातून पदवी धारण केलेल्या उमेदवारास अर्ज करता येईल. |
| २१ | महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक्र क्रमांकः मकसी-१००७/प्र.क्र.३६/का-३६, दिनांक १० जुलै, २००८ अन्वये महाराष्ट्र- कर्नाटक सिमा भागातील महाराष्ट्र शासनाने दावा सांगितलेल्या ८६५ गावातील मराठी भाषिक उमदेवारांना संबंधित पदांच्या सेवाभरती नियमातील सर्व अटींची पूर्तता ते करीत असल्यास त्यांना महाराष्ट्र शासनाच्या सेवेतील पदांवर नियुक्तीसाठी अर्ज करता येतील. |
| २२ | पंधरा वर्षे सैनिकी सेवा झालेला माजी सैनिक यांची शैक्षणिक अर्हता ही महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक : आरटीए-१०८२/२३२७/सीआर-६३/१६-अ, दिनांक ०५ ऑक्टोंबर, १९८९ नुसार असेल. |
| २३ | **सदरची परीक्षा स्थगित करणे, रद्द करणे, अशंत: बदल करणे, पदांच्या एकूण संख्येमध्ये बदल करण्याचा अधिकार नियुक्ती प्राधिकारी यांनी राखून ठेवला आहे.** |

**२. वयोमर्यादा**

गट-ब (अराजपत्रित) प्रवर्ग/उपप्रवर्गासाठी किमान व कमाल वयोमर्यादा

| अ.क्र. | संवर्ग | वयोमर्यादा गणण्याचा दिनांक | वय | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | किमान अमागास/ मागासवर्गीय/ आ.दु.घ | कमाल | | प्राविण्य प्राप्त खेळाडू | | दिव्यांग उमेदवार |
| | | | | अमागास | मागासवर्गीय/ अनाथ /आ.दु.घ | अमागास | मागासवर्गीय/ आ.दु.घ | |
| १ | विधी सहायक | ०३ ऑक्टोबर २०२५ | १८ | ३८ | ४३ | ४३ | ४३ | वयाच्या ४५ वर्षापर्यंत |
| २ | लघुलेखक उच्च श्रेणी | | | | | | | |
| ३ | लघुलेखक कनिष्ठ श्रेणी | | | | | | | |

गट-क प्रवर्ग/उपप्रवर्गासाठी किमान व कमाल वयोमर्यादा

| अ.क्र. | संवर्ग | वयोमर्यादा गणण्याचा दिनांक | वय | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | किमान अमागास/मागासवर्गीय/ आ.दु.घ | कमाल | | प्राविण्य प्राप्त खेळाडू | | माजी सैनिक | | दिव्यांग उमेदवार/ दिव्यांग माजी सैनिक |
| | | | | अमागास | मागासवर्गीय/ अनाथ /आ.दु.घ | अमागास | मागासवर्गीय / आ.दु.घ | अमागास | मागासवर्गीय/ आ.दु.घ | |
| १ | निरीक्षक | ०३ ऑक्टोबर २०२५ | १८ | ३८ | ४३ | ४३ | ४३ | सैनिकी सेवेचा कालावधी अधिक ३ वर्षे | | वयाच्या ४५ वर्षापर्यंत |
| २ | वरिष्ठ लिपिक | | | | | | | | | |

विहित वयोमर्यादा इतर कोणत्याही बाबतीत शिथिल केली जाणार नाही.

*** मागासवर्गीय उमदेवार, दिव्यांग अनाथ आणि खेळाडू यांना असलेली वयोमर्यादेतील शिथिलतेची सवलत यापैकी कोणतीही अधिकतम असलेली एकच सवलत देय राहील:-**

| | |
|---|---|
| २.१ | सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन क्र. एसआरव्ही २०१५/प्र.क्र. ४०४/कार्या १२, दि.२५.०४.२०१६ नुसार सद्यस्थितीत खुल्या प्रवर्गातील उमेदवारांसाठी कमाल वयोमर्यादा ३८ वर्षे व मागासर्वीय उमेदवारांसाठी कमाल वयोमर्यादा ४३ वर्षे इतकी आहे. |
| २.२ | सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन निर्णय क्र. एसआरव्ही १०९८/प्र.क्र.३९/९८/१६-अ, दि.१६.०६.२००१ मधील तरतुदीनुसार दिव्यांग व्यक्तींना उच्चतम वयोमर्यादा सरसकट ४५ वर्षे इतकी राहील. |
| २.३ | सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील शुध्दीपत्रक क्र. मासैक-१०१०/प्र.क्र.२७९/१०/१६-अ, दि. २०.०८.२०१० प्रमाणे दिव्यांग माजी सैनिकांसाठी विहित वयोमर्यादेतील सवलतीच्या अनुषंगाने वयाची कमाल मर्यादा ४५ वर्षे इतकी राहील. |
| २.४ | सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील शुध्दीपत्रक क्र. मासैक-१०१०/प्र.क्र.२७९/१०/१६-अ, दि. २०.०८.२०१० अन्वये माजी सैनिकांसाठी विहित वयोमर्यादेतील सुट ही सदर उमेदवाराच्या सशस्त्र दलात झालेल्या सेवे इतका कालावधी अधिक ३ वर्षे इतकी राहील. |
| २.५ | सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन क्रमांक विकाक २२१५/ प्र.क्र.३३७/१६-अ, दि. ४.११.२०१६ नुसार प्रकल्पग्रस्त, भुकंपग्रस्त उमेदवारांकरीता कमाल वयोमर्यादा ४५ वर्षे इतकी राहील. |
| २.६ | सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन निर्णय क्र. अशंका १९१८/प्र.क्र. ५०७/१६-अ दि.०२.०१.२०१९ नुसार पदवीधर/पदविकाधारक अंशकालीन उमेदवारांना शासकीय/निमशासकीय सेवेतील महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कक्षेबाहेरील गट-क पदावरील सरळसेवेत करावयांच्या नियुक्तीसाठी निश्चित करण्यात आलेली ४६ वर्षे ही वयोमर्यादा ५५ वर्षे इतकी शिथिल करण्यात आलेली आहे. |
| २.७ | महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शुध्दीपत्रक क्र. निवक-१०१०/प्र.क्र.०८/२०१०/१६अ दि. ०६.१०.२०१० अन्वये स्वातंत्र्य सैनिकांचे पाल्यांसाठीचे वय ४५ वर्षे इतके राहील. |
| २.८ | महिला व बाल विकास विभाग, महाराष्ट्र शासन, शासन परिपत्रक क्रमांक-अनाथ-२०१८/प्र.क्र.१८२/का-०३, दि. २०.०८.२०१९ अन्वये अनाथ संवर्गामधील उमेदवारांना मागासवर्गीय प्रमाणे वय व फी मध्ये सवलत देण्यात येईल. |
| २.९ | महिला व बाल विकास विभाग, महाराष्ट्र शासन, शासन निर्णय क्रमांक महिआ |

| | |
|---|---|
| | २०२३/प्र.क्र.१२३/कार्या-२ दि.०४ मे २०२३ अन्वये उन्नत व प्रगत गटात मोडणाऱ्या वि.जा.(अ),भ.ज.(ब), भ.ज.(क), भ.ज.(ड), विमाप्र, इमाव प्रवर्गातील उमेदवार मागासवर्गीयांसाठी असलेले वय, परीक्षा शुल्क सवलत अथवा अन्य कोणत्याही सवलतीस पात्र नाहीत. |

**३.पदसंख्या व आरक्षणांसंदर्भात सर्वसाधारण तरतुदी :-**

| | |
|---|---|
| ३.१ | भरावयाच्या उपरोक्त संवर्ग पदांचे सामाजिक समांतर आरक्षण तसेच वर नमूद केलेली पदसंख्या आरक्षणामध्ये बदल होण्याची शक्यता आहे |
| ३.२ | पदसंख्या व आरक्षणामध्ये बदल झाल्यास याबाबतची माहिती बदल वेळोवेळी धर्मादाय आयुक्त कार्यालयाच्या https://charity.maharashtra.gov.in या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल व त्यानुसार भरती प्रक्रिया राबविण्यात येईल. |
| ३.३ | विविध सामाजिक प्रवर्ग, महिला, प्राविण्य प्राप्त खेळाडू, दिव्यांग व अनाथ इत्यादीसाठी सामाजिक व समांतर आरक्षण शासनाकडून वेळोवेळी जारी करण्यात आलेल्या आदेशानुसार राहील. |
| ३.४ | शासन निर्णय, महिला व बाल विकास विभाग क्रमांकः महिला २०२२/प्र.क्र.१२३/कार्या-२, दिनांक ०४ मे, २०२३ अन्वये विहित कार्यपध्दतीनुसार अराखीव महिलांकरीता आरक्षित पदाच्या निवडीसाठी, अराखीव महिला तसेच सर्व मागासप्रवर्गातील महिलांना नॉन-क्रिमिलेअर प्रमाणपत्र सादर करण्याची अट शिथिल करण्यात येत आहे. |
| ३.५ | अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती वगळता अन्य मागास प्रवर्गातील महिलांकरिता आरक्षित पदावरील निवडीसाठी दावा करू इच्छिणाऱ्या महिलांना संबंधित मागास प्रवर्गासाठी इतर मागास व बहुजन कल्याण विभाग तसेच सामान्य प्रशासन विभागाकडून वेळोवेळी विहित करण्यात आल्याप्रमाणे नॉन-क्रिमिलेअर प्रमाणपत्र सादर करण्याबाबतच्या तरतुदी लागू राहतील. |
| ३.६ | महिलांसाठी आरक्षित पदाकरीता दावा करणाऱ्या उमेदवारांनी महिला आरक्षणाचा लाभ घ्यावयाचा असल्यास त्यांनी महाराष्ट्राचे अधिवासी (Domiciled) असल्याबाबत तसेच अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती वगळून इतर सर्व मागास प्रवर्गातील महिलांसाठी नॉन-क्रिमिलेअर मध्ये मोडत असल्याबाबतचा स्पष्टपणे दावा करणे आवश्यक आहे. |
| ३.७ | विमुक्त जाती (अ), भटक्या जमाती (ब), भटक्या जमाती (क), भटक्या जमाती (ड), प्रवर्गासाठी आरक्षित असलेली पदे आंतर परिवर्तनीय असून आरक्षित पदासाठी संबंधित प्रवर्गातील योग्य व पात्र उमदेवार उपलब्ध न झाल्यास अद्ययावत शासन धोरणाप्रमाणे उपलब्ध प्रवर्गातील उमेदवाराचा विचार गुणवत्तेच्या आधारावर करण्यात येईल. |
| ३.८ | समांतर आरक्षणाबाबत शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक एसआरव्ही-१०१२/प्र.क्र.१६/१२/१६-अ, दिनांक १३ ऑगस्ट, २०१४ तसेच शासन शुध्दीपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक संकीर्ण-१११८/ प्र.क्र.३९/१६-अ, दिनांक १९ डिसेंबर, २०१८ आणि तद्नंतर शासनाने या संदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार कार्यवाही करण्यात येईल. |
| ३.९ | आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांतील (ईडब्ल्युएस) उमेदवारांकरीता शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र.राआधो-४०१९/ प्र.क्र.३१/१६-अ, दिनांक १२ फेब्रुवारी, २०१९ व दिनांक ३१ मे, २०२१ आणि तद्नंतर शासनाने या संदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार कार्यवाही करण्यात येईल. तसेच आर्थिक दृष्टया दुर्बल घटकातील दावा केलेल्या उमेदवारांनी सन २०२५-२०२६ या आर्थिक वर्षाचे प्रमाणपत्र, कागदपत्र पडताळणीच्या वेळी सादर करणे आवश्यक राहील |
| ३.१० | शासन शुध्दीपत्रक, इतर मागास बहुजन कल्याण विभाग, क्रमांक : संकीर्ण-२०२३/प्र.क्र.७६/मावक, दिनांक ९ मार्च, २०२३ अन्वये शासनाकडून जारी करण्यात आलेल्या आदेशानुसार संबंधित उमेदवार उन्नत आणि प्रगत व्यक्ती/गटात मोडत नसल्याबाबतची पडताळणी करण्यासाठी सन २०२५-२०२६ या आर्थिक वर्षाचे उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य राहील. |
| ३.११ | अराखीव (खुला) सर्वसाधारण पदावरील शिफारशीकरीता गुणवत्तेच्या आधारे सर्व उमेदवारांचा (मागासवर्गीय उमेदवारांसह) विचार होत असल्याने सर्व आरक्षित प्रवर्गातील उमेदवारांनी त्यांच्या प्रवर्गासाठी पद आरक्षित/उपलब्ध नसले, तरी अर्जामध्ये त्यांच्या मूळ प्रवर्गासंदर्भातील माहिती अचूकपणे नमूद करणे बंधनकारक आहे. |
| ३.१२ | सामाजिक अथवा समांतर आरक्षणाचा अथवा सोयीसवलतीचा दावा करणाऱ्या उमेदवारांकडे संबंधित |

| | |
|---|---|
| | कायदा/ नियम/आदेशानुसार विहित नमुन्यातील परीक्षेच्या जाहिरातीस अनुसरुन अर्ज स्विकारण्याठी विहित केलेल्या दिनांकापूर्वीचे वैध प्रमाणपत्र उपलब्ध असणे अनिवार्य आहे. वैध प्रमाणपत्राचा कालावधी संबंधित शासन आदेशावरील तरतुदीनुसार (लागू असेल त्या प्रमाणे) ग्राहय समजण्यात येईल. |
| ३.१३ | विमुक्त जाती (अ), भटक्या जमाती (ब), भटक्या जमाती, (क), भटक्या जमाती (ड), विशेष मागास प्रवर्ग व इतर मागासवर्गाचा दावा करणाऱ्या (या प्रवर्गातील महिला, खेळाडू, माजी सैनिक, दिव्यांग, अंशकालीन कर्मचारी, स्वातंत्र्यसैनिकांचे पाल्य, प्रकल्पग्रस्त, भूकंपग्रस्त या समांतर आरक्षणाचा दावा करण्याऱ्या) उमेदवारांनी उन्नत व प्रगत गटामध्ये मोडत आहेत किंवा नाही याबाबत अर्जामध्ये स्पष्टपणे नमूद करणे आवश्यक आहे. |

**४. दिव्यांग आरक्षण:-**

| | |
|---|---|
| ४.१ | दिव्यांग व्यक्तींची संबंधित संवर्ग/पदाकरीता पात्रता शासनाकडून वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार राहील. दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम २०१६ च्या आधारे शासन निर्णय विधि व न्याय विभाग, क्रमांक २३२१/प्र.क्र.२८/कार्या-०१ दिनांक २४.०२.२०२५ तसेच या संदर्भात शासनाकडून वेळोवेळी जारी करण्यात आलेल्या आदेशानुसार दिव्यांग व्यक्तींच्या आरक्षणासंदर्भात कार्यवाही करण्यात येईल. |
| ४.२ | प्रस्तुत परीक्षेमधून भरण्यात येणाऱ्या विविध संवर्ग / पदाकरिता दिव्यांग सुनिश्चिती संदर्भातील तपशिल खालीलप्रमाणे आहे. |

| अ.क्र. | पदनाम | शारिरिक पात्रता | दिव्यांग प्रवर्ग | सदर पदांची जबाबदाऱ्या व कर्तव्ये |
|---|---|---|---|---|
| १ | विधि सहायक | S,ST, W,SE,H,C | a)LV<br>b)HH<br>c)OA,OL,OAL,<br>LC,DW,AAV | मा. धर्मादाय आयुक्त कार्यालयामार्फत न्यायालयीन प्रकरणात कार्यालयाचे प्रतिनिधीत्व तसेच ज्या अनुषंगित सर्व पत्रव्यवहार व इतर कामकाज सादर करणे, धर्मादाय आयुक्त कार्यालयातील प्राप्त दावे तपासून कार्यवाही करणे. |
| २ | लघुलेखक उच्च श्रेणी | S,ST,<br>BN,RW,SE,<br>H,C | a)B,LV<br>c)OL,BL,<br>AAV,LC,DW | अधिकाऱ्यांनी नेमून दिलेली कामे करणे, अधिकाऱ्यांनी दिलेले न्यायनिर्णय व इतर आदेशांचे श्रुत लेखन करणे |
| ३ | लघुलेखक कनिष्ठ श्रेणी | S,ST,<br>W,RW,SE,H,C | a)B,LV<br>c)OL,BL,<br>AAV,LC,DW | अधिकाऱ्यांनी नेमून दिलेली कामे करणे, अधिकाऱ्यांनी दिलेले न्यायनिर्णय व इतर आदेशांचे श्रुत लेखन करणे |
| ४ | निरीक्षक | S,ST,W,BN,<br>MF,SE,RW,H,C | a)B,LV<br>b) HH<br>c)OA,OL,OAL,BL<br>LC,DW,AAV | संस्था/न्यास यांच्या निरीक्षणाकरीता दौरे करणे, न्यासाच्या विरुध्द दाखल तक्रारींचे चौकशी करुन अहवाल वरिष्ठांकडे सादर करणे, न्यासांचे मिळकतीचे वरिष्ठांच्या आदेशानुसार |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | | निरीक्षण घेऊन अहवाल सादर करणे, न्यासाचे हिशोब पत्रके छाननी करुन दाखल करुन घेणे, तसेच वरिष्ठांच्या आदेशाप्रमाणे हिशोब पत्रकाबाबत नोटीसा बजाविणे, तसेच इतर कार्यालयीन कामकाज करणे, शुल्क भरुन घेणे, अधिकारी यांचे बोर्डावरील न्यायिक प्रकरणे हाताळणे, दैनंदिन प्रकरणे बोर्डावर घेणे, रोजनामे लिहिणे, वरिष्ठांच्या आदेशानुसार न्यासांना नोटीसा बजावणे अर्ध न्यायिक कामकाजात मदत करणे सर्व प्रकरणांचा रोजनामा लिहिणे व मासिक लेखा/ वार्षिक लेखा ठेवणे |
| ५. | वरिष्ठ लिपिक | S,ST,W,RW,H,C, MF, SE | a)B,LV<br>b) HH<br>c)OA,OL,BL,OAL, LC,DW,AAV | परिशिष्ठ १ मध्ये न्यासांच्या नोंदणी घेणे, विषयाशी संबंधित पत्र व्यवहार हाताळणे, नस्ती निर्णयासाठी वरिष्ठांना सादर करणे इत्यादी कार्यालयीन कामकाज. न्यासांच्या अभिलेख्याचे जतन, नोंदणी, तसेच पुर्नलेखन करणे, अभिलेख्याच्या सत्य प्रती करीता आलेल्या अर्जावर कार्यवाही करुन वरिष्ठांकडे सादर करणे. |

Abbreviations :-

| Sr. No. | Abbreviation | Long Form | Sr.No. | Abbreviation | Long Form |
|---|---|---|---|---|---|
| १ | S | Sitting | ८ | MF | Manipulation by Fingers |
| २ | ST | Standing | ९ | SE | Seeing |
| ३ | W | Walking | १० | H | Hearing |
| ४ | BN | Bending | ११ | C | Communication |
| ५ | L | Lifting | १२ | RW | Reading and Writing |
| ६ | PP | Pulling and Pushing | १३ | KC | Kneeling and Crouching |
| ७ | JU | Jumping | १४ | CL | Climbing |

Abbreviations :-

| Sr.No. | Abbreviation | Long Form | Sr.No. | Abbreviation | Long Form |
|---|---|---|---|---|---|
| १ | B | Blind | १२ | CP | Cerebral Palsy |
| २ | LV | Low Vision | १३ | LC | Leprosy Cured |
| ३ | D | Deaf | १४ | DW | Dwarfism |
| ४ | HH | Hearing Handicapped | १५ | AAV | Acid Attack Victim |
| ५ | OA | One Arm | १६ | MDy | Muscular Dystrophy |
| ६ | OL | One Leg | १७ | ASD | Autism Spectrum Disorder (M-Mild) |
| ७ | BA | Both Arms | १८ | ID | Intellectual Disability |
| ८ | BL | Both Legs | १९ | SLD | Special Learning Disability |
| ९ | OAL | One Arm and One Leg | २० | MI | Mental Illness |
| १० | BLOA | Both Leg and One Arm | २१ | MD | Multiple Disabilities |
| ११ | BLA | Both Legs Arms | | | |

४.३ दिव्यांग व्यक्तींची संबंधित संवर्ग/पदाकरीता पात्रता शासनाकडून वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार राहील.

४.४ दिव्यांग व्यक्तीसाठी आरक्षित पदांवर शिफारस करताना उमेदवार कोणत्या सामाजिक प्रवर्गातील आहे, याचा विचार न करता दिव्यांग गुणवत्ता क्रमांकानुसार त्यांची शिफारस करण्यात येईल.

४.५ दिव्यांग व्यक्तीसाठी असलेली पदे एकूण भरावयाच्या पदसंख्येच्या ४% असतील.

४.६ संबंधित दिव्यांगत्वाच्या प्रकाराचे किमान ४०% दिव्यांगत्वाचे प्रमाणपत्रधारक उमेदवार /व्यक्ती आरक्षण तसेच नियमानुसार अनुज्ञेय सोयी/सवलतीसाठी पात्र असतील.

४.७ लक्षणीय दिव्यांगत्व असलेले उमेदवार/व्यक्ती खालील सवलतींच्या दाव्यास पात्र असतील :-
(1) दिव्यांगत्वाचे प्रमाण किमान ४०% अथवा त्यापेक्षा जास्त असल्यास तसेच पद लक्षणीय दिव्यांग व्यक्तींसाठी आरक्षित असल्यास नियमानुसार अनुज्ञेय आरक्षण व इतर सोयी सवलती लागू राहतील.
(2) दिव्यांगत्वाचे प्रमाण किमान ४०% अथवा त्यापेक्षा जास्त असल्यास तसेच पद संबंधित दिव्यांग प्रकारासाठी सुनिश्चित केले असल्यास नियमानुसार अनुज्ञेय असलेल्या सोयी सवलती लागू राहतील.

४.८ लक्षणीय दिव्यांग व्यक्तींसाठी असलेल्या वयोमर्यादेचा अथवा इतर कोणत्याही प्रकारचा फायदा घेऊ इच्छिणा-या उमेदवारांनी शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्रमांक अप्रकि २०१८/प्र.क्र.४६/आरोग्य ६, दिनांक १४ सप्टेंबर, २०१८ मधील आदेशानुसार केंद्र शासनाच्या www.swavlambancard.gov.in अथवा SADM या संगणकीय प्रणालीद्वारे वितरित करण्यात आलेले नवीन नमुन्यातील दिव्यांगत्वाचे प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे.

४.९ शासन परिपत्रक, दिव्यांग कल्याण विभाग, क्रमांकः दिव्यांग-२०२४/प्र.क्र.८६, दि.क.२, दिनांक २७ जून, २०२४ अन्वये सार्वजनिक आरोग्य विभागाच्या दिनांक १४ सप्टेंबर, २०१८ च्या शासन निर्णयान्वये/ भविष्यात वेळोवेळी स्थापन करण्यात आलेल्या येणाऱ्या वैद्यकीय मंडळामार्फत दिव्यांगत्व प्रमाणपत्र व वैश्विक ओळखपत्र (UDID Card) प्राप्त करुन घेणे अनिवार्य आहे.वैश्विक ओळखपत्र (UDID Card) प्राप्त करुन घेण्यासाठी नोंदणी केल्यानंतर प्रत्यक्षात सदर ओळखपत्र प्राप्त होईपर्यंतच्या कालावधीसाठी दिव्यांग व्यक्तींना दिव्यांगत्वाच्या सवलती / योजनांचा लाभ घेण्यासाठी त्यांच्याकडे असलेले दिव्यांगत्व प्रमाणपत्रासोबत वैश्विक ओळखपत्रासाठीचा नाव नोंदणी क्रमांक (Enrollment

| | |
|---|---|
| | Number) सादर करणे अनिवार्य राहील. |
| ४.१० | लक्षणीय दिव्यांगत्व असणाऱ्या उमेदवारांना अर्जामध्ये नमूद केलेला दिव्यांगत्वाचा प्रकार/उप प्रकार बदलणे अनुज्ञेय नाही. |
| ४.११ | सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्र.आरटीए १०८२/३५०२/सीआर-१००/१६-अ, दि.०२ सप्टेंबर १९८३ अन्वये<br>अ) माजी सैनिकांसाठी आरक्षित असलेल्या पदांवर भरती करताना युध्द काळात आणि युध्द नसताना सैन्यातील सेवेमुळे दिव्यांगत्व आले असल्यास असा माजी सैनिक १५% राखीव पदांपैकी उपलब्ध पदांवर प्राधान्यक्रमाने नियुक्ती देण्यास पात्र राहील.<br>आ) युध्द काळात किंवा युध्द नसताना सैनिक सेवेत मृत झालेल्या किंवा दिव्यांगत्व येऊन त्यामुळे नोकरीसाठी अयोग्य असलेल्या माजी सैनिकांच्या कुटुंबातील फक्त एका व्यक्तीला त्यानंतरच्या पसंतीक्रमाने १५% आरक्षित पदांपैकी उपलब्ध पदावर नियुक्तीस पात्र राहील. तथापि, सदर उमेदवाराने पदासाठी आवश्यक शैक्षणिक अर्हता धारण केलेली असणे आवश्यक आहे. |

**५. खेळाडू आरक्षण :-**

| | |
|---|---|
| ५.१ | शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रमांकः राक्रीधो-२००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे-२, दिनांक ०१ जुलै, २०१६, तसेच शासन शुध्दीपत्रक, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रमांकः राक्रीधो-२००२/प्र.क्र. ६८/क्रीयुसे- २,दिनांक १८ ऑगस्ट, २०१६, तसेच शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,क्रमांकः संकीर्ण १७१६/ प्र.क्र.१८/क्रीयुसे-२, दिनांक ३० जून,२०२२ शासन निर्णय शालेय शिक्षण व क्रीडा विभागक्रमांकः खेआक्ष २७२५/प्र.क्र.३३/क्रीयुसे-०२, दिनांक १५ मे, २०२५ आणि तद्नंतर शासनाने यासंदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार प्राविण्य प्राप्त खेळाडू आरक्षणासंदर्भात तसेच त्यांचे वयोमर्यादेतील सवलती संदर्भात कार्यवाही करण्यात येईल. |
| ५.२ | प्राविण्य प्राप्त खेळाडू व्यक्तीसाठी असलेल्या आरक्षणाचा दावा करणा-या उमेदवारांच्या बाबतीत क्रीडा विषयक अर्हता धारण करीत असल्याबाबत तसेच उमेदवार कोणत्या संवर्गातील खेळाडूसाठी आरक्षित पदावर निवडीकरीता पात्र ठरतो याविषयी संबंधित विभागीय क्रीडा उपसंचालक यांनी प्रमाणपत्र प्रदान केलेला विहित नमुन्यातील प्राविण्य प्रमाणपत्र पडताळणीबाबतचा अहवाल अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकाचे किंवा तत्पूर्वीचे असणे अनिवार्य आहे. |
| ५.३ | खेळाचे प्राविण्य प्रमाणपत्र योग्य दर्जाचे असल्याबाबत तसेच तो खेळाडू उमेदवार खेळाडूसाठी आरक्षित पदावरील निवडीकरीता पात्र ठरतो, याविषयीच्या पडताळणीकरीता त्यांचे प्राविण्य प्रमाणपत्र संबधित विभागीय उपसंचालक कार्यालयाकडे अर्ज सादर करण्याच्या दिनांकापूर्वीच सादर केलेले असणे बंधनकारक आहे. अन्यथा प्राविण्य प्राप्त खेळाडू आरक्षणाकरीता पात्र समजण्यात येणार नाही. |
| ५.४ | कागदपत्रे पडताळणी वेळी खेळाडू उमेदवारांनी विहित अर्हता धारण करीत असल्याबाबत सक्षम प्राधिकाऱ्याने प्रमाणित केलेले प्राविण्य प्रमाणपत्र तसेच त्याचे प्राविण्य प्रमाणपत्र योग्य असल्याबाबत तसेच खेळाडू कोणत्या संवर्गातील खेळाडूसाठी आरक्षित पदावरील निवडीकरीता पात्र ठरतो, याविषयीचा सक्षम प्राधिकाऱ्याने प्रदान केलेले प्राविण्य प्रमाणपत्र पडताळणीबाबतचा अहवाल सादर केला तरच उमेदवाराचा संबंधित संवर्गातील खेळाडूसाठी आरक्षित पदावर शिफारसी नियुक्तीकरीता विचार करण्यात येईल. |
| ५.५ | एकापेक्षा जास्त खेळांची प्रमाणपत्रे असणाऱ्या खेळाडू उमेदवाराने एकाच वेळेस सर्व खेळांची प्राविण्य प्रमाणपत्रे प्रमाणित करण्याकरीता संबंधित उपसंचालक कार्यालयाकडे सादर करणे बंधन धकारक आहे. |

**६. अनाथ आरक्षण :-**

| | |
|---|---|
| ६.१ | अनाथ व्यक्तीचे आरक्षण शासन निर्णय, महिला व बालविकास विभाग, क्रमांकःअनाथ-२०२२/प्र.क्र.१२२/का-०३,दिनांक ०६ एप्रिल २०२३ तसेच तद्नंतर यासंदर्भात शासनाकडून वेळोवेळी जारी करण्यात येणाऱ्या आदेशानुसार राहील.<br>तसेच विहित केलेल्या कार्यपध्दतीनुसार एखादया भरती प्रक्रियेमध्ये अनाथ आरक्षणाच्या एका प्रवर्गासाठी उपलब्ध जागांवर गुणवत्तेनुसार त्या प्रवर्गातील अनाथ उमेदवार पर्याप्त प्रमाणात उपलब्ध |

| | |
|---|---|
| | होऊ शकले नाही तर त्या भरती प्रकियेमध्ये ती पदे अनाथाच्या दुसऱ्या प्रवर्गातील उमेदवाराच्या गुणवत्तेनुसार भरण्यात येतील. |
| ६.२ | अनाथ व्यक्तींसाठी आरक्षित पदावर गुणवत्तेनुसार निवड झालेल्या उमेदवारांचा समावेश उमेदवार ज्या सामाजिक प्रवर्गाचा आहे, त्या प्रवर्गातून करण्यात येईल. |
| ६.३ | प्रस्तुत पदासाठी अर्जाव्दारे अनाथ आरक्षणाचा दावा केलेल्या उमेदवारांनी दिनांक ०६ सप्टेंबर, २०२२, दिनांक ०६ एप्रिल, २०२३ आणि दिनांक १० मे, २०२३ रोजीच्या शासन निर्णयाव्दारे विहित करिण्यात आलेल्या कार्यपध्दतीनुसार सुधारीत नमुन्यातील अनाथ प्रमाणप्रत्र व महाराष्ट्र राज्याचे अधिवास प्रमाणपत्र विहित कालावधीत सादर करणे आवश्यक राहील. |
| ६.४ | अनाथ व्यक्तीसाठी असलेली पदे एकूण भरावयाच्या पदसंख्येच्या १% असतील. |
| ६.५ | महाराष्ट्र शासन, महिला व बाल विकास विभाग, शासन परिपत्रक क्रमांक- अनाथ२०१८क्र.प्र/१८२-का/०३, दि.२० ऑगस्ट, २०१९ अन्वये अनाथ संवर्गामधील उमेदवारांना मागासवर्गीय प्रमाणे वय व फी मध्ये सवलत देण्यात येईल. |

**७. निवड पध्दत :-**

| | |
|---|---|
| ७.१ | जाहिरातीमध्ये नमूद पदास आवश्यक असलेली अर्हता अथवा अनुभव शिथिल केला जाणार नाही. |
| ७.२ | नोंदणी प्रक्रियेनंतर प्रवेशपत्र डाऊनलोड करण्यासाठी एक लिंक विकसित केली जाते. एकदा धर्मादाय आयुक्त कार्यालयाच्या लिंक होस्ट केल्यानंतर, उमेदवाराला ई-मेल व मोबाईल क्रमांकावर लघुसंदेशाद्वारे त्याबाबत सूचित केले जाईल. उमेदवार थेट लिंकवरून त्याचे प्रवेशपत्र डाऊनलोड करु शकतात. प्रवेशपत्राबाबत कोणताही वेगळा पत्रव्यवहार केला जाणार नाही. |
| ७.३ | परीक्षा ऑनलाईन पध्दतीने घेणेत येईल. परीक्षेचे ठिकाण, दिनांक व वेळ ई-मेल किंवा लघुसंदेशाद्वारे संबंधित उमेदवारांना कळविण्यांत येईल. |
| ७.४ | जाहिरातीस अनुसरुन प्राप्त झालेल्या अर्जाची संख्या वाजवी प्रमाणापेक्षा जास्त असेल आणि अर्ज सादर केलेल्या सर्व पात्र उमेदवारांच्या परीक्षा घेणे सोयीस्कर नसल्यास परीक्षेसाठी उमेदवारांची संख्या मर्यादित करण्याच्या दृष्टीने जाहिरातीत दिलेल्या शैक्षणिक अर्हता आणि / अथवा अनुभव यापेक्षा जादा शैक्षणिक अर्हता / अनुभव किंवा अन्य योग्य निकष यांच्या आधारे निकष निश्चित करुन अंतिम परीक्षेस पात्र उमेदवारांची संख्या मर्यादित करण्यात येईल. |
| ७.५ | **उमेदवारांची निवड निव्वळ गुणवत्तेच्या आधारे केली जाईल. गुणवत्ता यादीत अंतर्भाव करण्यासाठी उमेदवाराने एकूण गुणांच्या किमान ४५% गुण प्राप्त करणे आवश्यक आहे.** |
| ७.६ | सरळसेवा भरतीकरिता घेण्यात येणाऱ्या लेखी परीक्षेच्या अनुषंगाने उमेदवारांच्या उत्तरपत्रिकांची / उत्तरपुस्तिकांची गुणपडताळणी अथवा फेर तपासणी केली जाणार नाही. अथवा या संदर्भात कोणत्याही प्रकारच्या अभिवेदनावर कार्यवाही केली जाणार नाही याची नोंद घ्यावी. |
| ७.७ | उमेदवार विशिष्ट पदावर नेमणूक होण्यास कितपत योग्य आहे आणि त्याची मानसिक क्षमता किती आहे ते आजमावणेकरीता परीक्षेच्या वेळी विचारण्यात येणाऱ्या प्रश्नांमध्ये इतर प्रश्नांबरोबर ज्या पदासाठी अर्ज केलेला असेल, त्या पदाची कर्तव्ये व जबाबदाऱ्या, उमेदवाराने ज्ञानाच्या ज्या विशिष्ट क्षेत्रातील विशेषज्ञता प्राप्त केली असेल त्या क्षेत्रातील अद्ययावत घडामोडी व त्याला असलेली माहिती आणि जनतेच्या समस्या या संबंधीचे प्रश्न यांचाही समावेश असेल. |
| ७.८ | पात्र ठरणाऱ्या उमेदवारांची संख्या विचारात घेऊन संभाव्य निवड क्षेत्रामध्ये येणाऱ्या उमेदवारांना कागदपत्रे तपासणीसाठी पाचारण करण्यात येईल. त्याबाबतची यादी व वेळापत्रक धर्मादाय आयुक्त कार्यालयाच्या https://charity.maharashtra.gov.in या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. तसेच उमेदवाराच्या ई-मेल अथवा मोबाईलवर लघुसंदेशाद्वारे कळविण्यात येईल. |
| ७.९ | निवडसूचीतील उमेदवाराची व त्या उमेदवाराने ऑनलाईन पध्दतीने सादर केलेल्या कागदपत्रांची पडताळणीसाठी (Verification) उमेदवारांने मूळ (Original) कागदपत्रासह प्रत्यक्ष हजर राहणे आवश्यक आहे. |
| ७.१० | **निवडसूची प्रवर्गनिहाय तयार करण्यात येईल व त्यामध्ये समाविष्ट करावयाच्या उमेदवारांची संख्या** |

| | |
|---|---|
| | पुढीलप्रमाणे असेल.<br><br>**प्रवर्गनिहाय रिक्त पदांची संख्या** / **निवडसूचीमध्ये समाविष्ट करावयाच्या उमेदवारांची संख्या**<br>१ — ३<br>२ ते ४ — रिक्त पदे अधिक रिक्त पदांच्या १०० टक्के किंवा ५ यापैकी जे अधिक असेल ते.<br>५ ते ९ — रिक्त पदे अधिक रिक्त पदांच्या ५० टक्के किंवा १० यापैकी जे अधिक असेल ते.<br>१० ते ४९ — रिक्त पदे अधिक रिक्त पदांच्या ३० टक्के किंवा १५ यापैकी जे अधिक असेल ते.<br>५० किंवा याहून अधिक — रिक्त पदे अधिक रिक्त पदांच्या २५ टक्के<br>वरीलप्रमाणे अतिरिक्त उमेदवारांच्या संख्येची परिगणना करताना उमेदवारांची संख्या अपूर्णांकात येत असल्यास पुढील संख्या विचारात घेण्यात येईल. |
| ७.११ | पात्र ठरलेल्या प्रत्येक उमेदवाराला त्याने रजिस्टर्ड केलेल्या ई-मेल आयडीवर / भ्रमणध्वनीवर लघुसंदेशाद्वारे निवडसूची /प्रतिक्षा यादी नियुक्तीबाबत कळविण्यांत येईल. तसेच धर्मादाय आयुक्त कार्यालयाच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. |
| ७.१२ | निवड समितीने तयार केलेली निवडसूची १ वर्षासाठी विधीग्राहय राहील. त्यानंतर ही निवडसूची आपोआप व्यपगत होईल. |
| ७.१३ | कागदपत्रे पडताळणीसाठी उमेदवाराने शैक्षणिक अर्हता, अनुभव, जाती प्रमाणपत्र, जात वैधता प्रमाणपत्र, वयाबाबतचा पुरावा, अधिवास प्रमाणपत्र, नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र, प्रकल्पग्रस्त दाखला, भूकंपग्रस्त दाखला, दिव्यांग प्रमाणपत्र, खेळांडूचे प्रमाणपत्र, माजी सैनिक असल्याबाबतचे प्रमाणपत्र, अंशकालीन उमेदवार प्रमाणपत्र, अनाथ असल्याबाबतचे प्रमाणपत्र इ. बाबतची मूळ कागदपत्रे व त्याच्या प्रत्येकी दोन स्वसाक्षांकित प्रतीसह उपस्थित राहणे आवश्यक आहे. कागदपत्रे तपासणीचे वेळी उमेदवार शैक्षणिक व इतर अर्हता धारण करीत नसल्याचे आढळून आल्यास किंवा तपासणीकरीता अपूर्ण कागदपत्रे सादर केल्यास त्यास निवडीसाठी अपात्र करणेत येईल व त्याबाबत उमेदवारांची कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही. |
| ७.१४ | कागदपत्रे तपासणीअंती निवड यादी व प्रतिक्षा यादी धर्मादाय आयुक्त कार्यालयाच्या https://charity.maharashtra.gov.in या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. |
| ७.१५ | शासन निर्णय प्रतिमं १२२२/प्र.क्र.५४/का.१३,-अ दि. ०४/०५/२०२२ अन्वये वरील गट-ब (अराजपत्रित) व गट-क च्या पदांसाठी मौखिक परीक्षा घेतली जाणार नाही. |

**८. समान गुण धारण करणाऱ्या उमेदवारांची प्राधान्य क्रमवारी :-**

| | |
|---|---|
| ८.१ | अ) आत्महत्या ग्रस्त शेतकऱ्याच्या पाल्यास प्रथम प्राधान्य राहील. |
| ८.२ | ब) समान गुणप्राप्त उमेदवारांमध्ये आत्महत्याग्रस्त शेतकऱ्याचा पाल्य नसेल अथवा वरील अ.क्र. (अ) नुसार एकापेक्षा अधिक उमेदवार समान गुणप्राप्त करीत असतील तर त्यापैकी वयाने जेष्ठ असलेल्या उमेदवारास प्राधान्य देण्यात येईल. |
| ८.३ | क) वरील अनु.क्र.(८.१) व (८.२) या दोन्ही अटींमध्ये देखील समान ठरत असलेल्या उमेदवारांच्या बाबतीत, अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकास उच्चतर शैक्षणिक अर्हता (पदव्युतर पदवी, पदवी, उच्च माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण, माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण अशा प्रकारे) धारण करणाऱ्या उमेदवारांस प्राधान्यक्रम देण्यात येईल. |
| ८.४ | वरील अनु.क्र.(८.२ व ८.३) या तिन्ही अटींमध्ये देखील समान ठरत असलेल्या उमेदवारांच्या बाबतीत, सदर पदाच्या सेवाप्रवेश नियमामध्ये विहित असलेल्या किमान शैक्षणिक अर्हतेमध्ये उच्चतर गुण प्राप्त उमेदवारास प्राधान्यक्रम देण्यात येईल. |
| ८.५ | वरील निकष लागूनही उमेदवारांची गुणानुक्रम समान येत असल्यास अशा उमेदवारांचा गुणवत्ताक्रम त्यांच्या इंग्रजीमधील आडनावाच्या आद्याक्षरानुसार निश्चित करण्यात येईल. |

| | |
|---|---|
| ८.६ | सेवा प्रवेश नियम/ जाहिरात / अधिसूचनेमध्ये अनुभव विहित केला असल्यास, अर्ज स्विकारण्याच्या अंतिम दिनांकास धारण करीत असलेल्या विहित अनुभवाचा कालावधी विचारात घेण्यात येईल. |
| टीप:- | आत्महत्याग्रस्त शेतकऱ्याचा पाल्य म्हणजे महसूल व वन विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन निर्णय क्र. एससीवाय १२०५/प्र.क्र.१८९/म-७, दि. २३/०१/२००६ अन्वये गठीत करण्यात आलेल्या जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखालील जिल्हास्तरीय समितीने ज्या कुटूंबास शेतकऱ्याच्या आत्महत्या प्रकरणी मदतीसाठी पात्र ठरविले असेल अशा कुटूंबातील मृत शेतकऱ्याचा पाल्य (पत्नी/मुलगे/मुलगी) होय. |

**९. अर्ज, अर्हता इत्यादी :-**

| | |
|---|---|
| ९.१ | धर्मादाय आयुक्त कार्यालयाच्या https://charity.maharashtra.gov.in या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आलेल्या लिंकव्दारे भरलेल्या ऑनलाईन अर्जाशिवाय अन्य कोणत्याही प्रकारे भरलेले अर्ज स्विकारले जाणार नाहीत. तसेच अर्ज स्विकारण्यासाठी विहित केलेल्या अंतिम दिनांक व वेळेनंतर अर्ज करण्याची कार्यप्रणाली बंद होईल. |
| ९.२ | महाराष्ट्र शासन, केंद्र शासन, स्थानिक स्वराज्य संस्था आणि इतर सेवेत असलेल्या उमेदवारांनी विहित नमुन्यातील अर्ज ऑनलाईन पद्धतीने सादर करावा. त्याच वेळी त्यांनी ज्या पदासाठी अर्ज केला असेल, त्या पदाचे नाव, जाहिरातीचा संदर्भ व अर्ज स्विकारण्यासाठी विहित केलेला अंतिम दिनांक इ. तपशील आपल्या विभाग/ कार्यालय प्रमुखांना कळवावा आणि आपला अर्ज विचारात घेतला जाण्यास कोणताही आक्षेप असल्यास, अर्ज स्विकारण्याच्या अखेरच्या दिनांकापासून ३० दिवसांच्या आत धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना परस्पर कळविणेची विनंती आपल्या विभाग/ कार्यालय प्रमुखांना करावी. |

**१०. अर्ज भरणे व सादर करणेबाबत आवश्यक सूचना :-**

| | |
|---|---|
| १०.१ | उमेदवारांनी अर्ज भरण्यापूर्वी https://charity.maharashtra.gov.in या वेबसाईटवर जाऊन जाहिरात सविस्तर अभ्यासावी व नंतरच आपला अर्ज भरावा. |
| १०.२ | उमेदवारास अर्ज सादर करताना काही तांत्रिक समस्या उद्धवल्यास ०२२-२४९७६४२२ या हेल्पलाईनवर संपर्क साधावा. तसेच जाहिरात मधील बाबीसंबंधी, काही विचारणा करावयाची असल्यास या ०२२-२४९७६४२२ हेल्पलाईनवर सोमवार ते शुक्रवार १०:३० ते १७: ३० वाजेपर्यंत संपर्क साधावा. |
| १०.३ | ऑनलाईन अर्ज सादर करावयाचे वेळापत्रक |

उमेदवारास ऑनलाईन पद्धतीने अर्ज व ऑनलाईन पद्धतीने परीक्षा शुल्क भरण्यासाठी पुढीलप्रमाणे कालावधी उपलब्ध असेल.

| अ.क्र. | तपशील | दिनांक/ वेळ |
|---|---|---|
| १ | ऑनलाईन पद्धतीने अर्ज सादर करण्यासाठी व ऑनलाईन पद्धतीने परीक्षा शुल्क भरण्यासाठी लिंक सुरु होण्याचा दिनांक व वेळ | दि. ११/०९/२०२५ वेळ १४:०० पासून |
| २ | ऑनलाईन पद्धतीने अर्ज सादर करण्यासाठी व ऑनलाईन पद्धतीने परीक्षा शुल्क भरण्यासाठी अंतिम दिनांक व वेळ | दि. ०३/१०/२०२५ वेळ २३.५५ वाजेपर्यंत |

- ऑनलाईन अर्जासोबत ऑनलाईन पद्धतीने भरलेले परीक्षा शुल्क कोणत्याही परिस्थितीत उमेदवारास परत केले जाणार नाही. ऑनलाईन शुल्क भरताना बँकेचे इतर शुल्क उमेदवारास स्वतः भरावे लागतील, ऑनलाईन परीक्षेच्या वेळी सदर ई-पावतीची छायांकीत प्रत प्रवेशासोबत सादर करणे आवश्यक आहे.
- परीक्षा शुल्क ना परतावा (NON REFUNDABLE) आहे.

| | |
|---|---|
| | ❖ कोणत्याही कारणास्तव पदभरती प्रक्रिया स्थगित/ रद्द झाल्यास उमेदवारास पदभरती शुल्क परत करण्यात येणार नाही. |
| १०.४ | अर्जात हेतूपरस्पर खोटी माहिती देणे किंवा खरी माहिती दडवून ठेवणे किंवा त्यात बदल करणे किंवा पाठविलेल्या दाखल्यांच्या नोंदीत अनधिकृतपणे खाडाखोड करणे किंवा खाडाखोड केलेले वा बनावट दाखले सादर करणे, परीक्षा कक्षात गैरवर्तण करणे, परीक्षेच्या वेळी नक्कल (COPY) करणे, वशिला लावण्याचा प्रयत्न करणे यासारखे अथवा परीक्षा कक्षाचे बाहेर अथवा परीक्षेच्यानंतरही गैरप्रकार करणाऱ्या उमेदवारांना गुण कमी करणे, विशिष्ट किंवा सर्व परीक्षांना वा निवडींना अनर्ह ठरविणे यापैकी प्रकरणपरत्वे योग्य त्या शिक्षा करणेचा तसेच प्रचलित कायदा व नियमांचे अनुषंगाने योग्य ती कारवाई करणेचे अधिकार धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना राहतील. तसेच विहित केलेल्या अर्हतेच्या अटी/ शर्ती पूर्ण न करणारा अथवा गैरवर्तणूक करणारा उमेदवार कोणत्याही टप्प्यावर निवड होण्यास अपात्र ठरेल. तसेच निवड झाल्यानंतर देखील सेवा समाप्तीस पात्र ठरेल. |
| १०.५ | वयाच्या पुराव्यासाठी सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेला जन्माचा दाखला, शाळा सोडल्याचा दाखला, माध्यमिक (SSC) परीक्षा उत्तीर्ण प्रमाणपत्र, वय व अधिवासाबाबत शासनाकडील सक्षम प्राधिकाऱ्यांने दिलेले प्रमाणपत्र ग्राह्य धरण्यात येईल. |
| १०.६ | शैक्षणिक अर्हतेसंदर्भात आवश्यक माहिती दिलेल्या क्रमाणे नमूद करावे. संबंधित परीक्षेच्या गुणपत्रकावरील दिनांक हा शैक्षणिक अर्हता धारण केल्याचा दिनांक समजण्यात येईल व त्या आधारे उमेदवाराची पात्रता ठरविण्यात येईल. |
| १०.७ | गुणांऐवजी श्रेणी पद्धत असल्यास गुणपत्रकासोबत श्रेणीची यादी सादर करावी. |
| १०.८ | ऑनलाईन पद्धतीने अर्ज सादर करण्याची सर्वसाधारण प्रक्रिया खालीलप्रमाणे आहे.<br>१. प्रोफाईल निर्मिती/ प्रोफाईल अद्ययावत करणे.<br>२. अर्ज सादरीकरण.<br>३. शुल्क भरणा. |
| १०.९ | प्रोफाईल अद्ययावत करणे.<br>१. धर्मादाय आयुक्त कार्यालयाच्या https://charity.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात येणाऱ्या लिंकव्दारे, वापरकर्त्याने त्याचे नविन प्रोफाईल तयार करावे. **नवीन वापरकर्त्यांची नोंदणी** या टॅब वर क्लिक केल्यानंतर संबंधित यंत्रणा लॉग-इन पृष्ठ प्रदर्शित करेल. त्यानुसार नवीन खाते (वापरकर्त्याचे नाव login व password) निर्माण करण्यासाठी लॉग-इन पृष्ठावर सर्व माहिती भरुन नोंदणीची प्रक्रिया पुर्ण करावी.<br>२. प्रोफाईलद्वारे माहिती भरताना उमेदवाराने स्वतःचाच वैध ई-मेल आयडी, वैध मोबाईल क्रमांक व जन्म दिनांक नोंदविणे आवश्यक आहे.<br>३.उमेदवाराकडे नित्य वापरात असेल असा ई-मेल आयडी व भ्रमणध्वनी क्रमांक असणे आवश्यक आहे.तसेच भरती प्रक्रिये दरम्यान पत्रव्यवहार, प्रवेशपत्र आणि इतर माहिती ऑनलाईन देण्यात येणार असल्यामुळे भरती प्रक्रियेच्या संपूर्ण कालावधीमध्ये नोंदणीकृत ई-मेल आयडी व भ्रमणध्वनी क्रमांक वैधकार्यरत राहणे आवश्यक आहे.<br>४. वरीलप्रमाणे प्रोफाईलची निर्मिती झाल्यानंतर वापरकर्त्याने स्वतःचा login व password द्वारे प्रवेश करुन प्रोफाईलमध्ये विचारलेली वैयक्तिक माहिती, संपर्क तपशील, इतर माहिती, शैक्षणिक अर्हता, अनुभव इ. संदर्भातील तपशीलाची अचूक नोंद करावी.<br>५. फोटो व स्वाक्षरी अपलोड करणे :-<br>नोंदणीची प्रक्रिया व प्रोफाईलद्वारे विचारलेली माहिती भरून झाल्यानंतर उमेदवाराने स्वतःचे छायाचित्र /फोटो (रुंदी ३.५ सें.मी. x लांबी ४.५ सें.मी.)स्वतःची स्वाक्षरी स्कॅन करुन खालीलप्रमाणे अपलोड करावी :-<br>१) एका पांढऱ्या स्वच्छ कागदावर विहित आकाराचा फोटो चिकटवावा. फोटोवर स्वाक्षरी करु नये अथवा फोटो साक्षांकित करु नये. वरील सुचनांनुसार फोटो कागदावर व्यवस्थित चिकटवावा. स्टॅपल अथवा पिनिंग करु नये. फक्तस्कॅनरवर ठेवून थेट स्कॅन करता येईल.<br>२) फोटोचा आकार खालीलप्रमाणे असणे गरजचे आहे. फोटो रुंदी ३.५ सें.मी. फोटो लांबी ४.५ सें.मी.<br>३) छायाचित्र अर्जाच्या दिनांकाच्या सहा महिन्याहून आधी काढलेले नसावे आणि ते ऑनलाईन |

| | |
|---|---|
| | परीक्षेच्या वेळी उमेदवाराच्या रुपाशी जुळणारे असावे.<br>४) विहित आकार क्षमतेप्रमाणे काळया शाईच्या (बॉल) पेनने स्वच्छ कागदावर स्वाक्षरी करावी. उमेदवाराने स्वतः स्वाक्षरी करणे आवश्यक आहे. अन्य कोणत्याही व्यक्तीने स्वाक्षरी केल्यास ती ग्राह्य धरली जाणार नाही.<br>५) वरीलप्रमाणे विहित आकारातील फक्त फोटो व स्वाक्षरी वेगवेगळी स्कॅन करावी. संपूर्ण पृष्ठे अथवा फोटो व स्वाक्षरी एकत्रित स्कॅन करु नये.<br>६) स्कॅन करुन अपलोड केलेली स्वाक्षरी, प्रवेशपत्र / हजेरीपट तत्सम कारणासाठी वापरण्यात येईल. परीक्षेच्यावेळी प्रत्यक्ष कागदपत्रे तपासणीच्या वेळी व अन्य कोणत्याही वेळी अर्ज भरताना केलेली स्वाक्षरी व फोटो न जुळल्यास उमेदवारास अपात्र ठरविण्यात येईल अथवा अन्य कायदेशीर कारवाई करण्यात येईल. |
| १०.१० | अर्ज नोंदणी<br>१. धर्मादाय आयुक्त कार्यालयाच्या https://charity.maharashtra.gov.in या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आलेल्या पर्यायावर क्लिक करा जे एक नवीन स्क्रिन उघडेल.<br>२. नवीन अर्ज करण्यासाठी योग्य टॅब निवडा आणि नाव, संपर्क तपशील आणि ई-मेल आयडी प्रविष्ठ करा. प्रणालीद्वारे तात्पुरता नोंदणी क्रमांक आणि पासवर्ड तयार केला जाईल आणि स्क्रिनवर प्रदर्शित केला जाईल. उमेदवाराने स्क्रीनवर दर्शविण्यात येणारा तात्पुरता नोंदणी क्रमांक आणि पासवर्ड जतन करून ठेवावा. तात्पुरता नोंदणी क्रमांक आणि पासवर्ड दर्शविणारा ई-मेल आणि लघुसंदेश देखील पाठविण्यात येईल.<br>३. जर उमेदवार एकाच वेळी अर्ज भरु शकत नसेल, तर तो सेव्ह आणि नेक्स्ट टॅब निवडून आधीच एंटर केलेला डेटा जतन करु शकतो. ऑनलाईन अर्ज सबमिट करण्यापूर्वी उमेदवारांना ऑनलाईन अर्जातील तपशीलांची पडताळणी करण्यासाठी सेव्ह आणि नेक्स्ट सुविधेचा वापर करण्याचा सल्ला देण्यात येत आहे आणि आवश्यक असल्यास त्यात बदल करावा. उमेदवावारांनी अर्ज काळजीपूर्वक भरावा आणि अंतिम सबमिशन करण्यापूर्वी ते बरोबर असल्याची खात्री करण्यासाठी तपशीलांची पडताळणी करुन घ्यावी.<br>४. उमेदवारांनी ऑनलाईन अर्जातील तपशील काळजीपूर्वक भरावेत आणि त्याची पडताळणी करावी, कारण पूर्ण नोंदणी बटणावर क्लिक केल्यानंतर कोणताही बदल शक्य होणार नाही करणे शक्य होणार नाही.<br>५. उमेदवाराचे नाव किंवा त्याचे तिचे वडील/पती इ. चे नाव अर्जामध्ये बरोबर लिहिलेले असावे जसे ते प्रमाणपत्रे/ गुणपत्रिका /ओळख पुराव्यामध्ये दिसते. कोणताही बदल तफावत आढळल्यास उमेदवारी अपात्र ठरु शकते.<br>६. तुमचे तपशील सत्यापित करा आणि जतन करा आणि पुढील बटणावर क्लिक करुन तुमचा अर्ज जतन करा.<br>७. फोटो आणि स्वाक्षरी स्कॅनिंग आणि अपलोड करण्याच्या मार्गदर्शक तत्वामध्ये दिलेल्या वैशिष्ट्यानुसार उमेदवाराने फोटो आणि स्वाक्षरी अपलोड करण्याची कार्यवाही करावी.<br>८. नोंदणीपूर्वी संपूर्ण अर्जाचे तपासणी आणि पडताळणी करण्यासाठी प्रिव्हिव्ह टॅबवर क्लिक करा.<br>९. आवश्यक असल्यास तपशील सुधारावा आणि छायाचित्रे, स्वाक्षरी आणि इतर तपशील बरोबर असल्याची पडताळणी आणि खात्री केल्यानंतरच नोंदणी पूर्ण वर क्लिक करा.<br>१०. पेमेंट टॅबवर क्लिक करा आणि पेमेंटसाठी पुढे जावे व सबमिट बटणावर क्लिक करावे. |
| १०.११ | परीक्षा शुल्क भरणेः-<br>ऑनलाईन मोडः-<br>१. डेबिट कार्ड (Rupay/Visa/Master Card/Maestro), क्रेडिट कार्ड, इंटरनेट बँकिंग, IMPS, कॅश कार्ड्स/ मोबाईल वॉलेट वापरुन पेमेंट केले जाऊ शकते.<br>२. व्यवहार यशस्वीरित्या पूर्ण झाल्यावर एक ई-पावती तयार होईल.<br>३. ई-पावती तयार न होणे अयशस्वी फी प्रदान दर्शविते.<br>४. उमेदवारांनी ई-पावती आणि फी तपशील असलेल्या ऑनलाईन अर्जाची प्रिंटआऊट घेणे आवश्यक आहे. |

| | |
|---|---|
| १०.१२ | स्कॅनिंग आणि कागदपत्रे अपलोड करण्यासाठी मार्गदर्शक तत्वे.<br>ऑनलाईन अर्ज करण्यापूर्वी उमेदवाराने खाली दिलेल्या वैशिष्ट्यांनुसार त्याचा / तिचा फोटो, स्वाक्षरी असणे आवश्यक आहे.<br>छायाचित्र प्रतिमाः (३.५ width x ४.५ Length)<br>• छायाचित्र अलीकडील पासपोर्ट शैलीचे रंगीत चित्र असणे आवश्यक आहे.<br>• हलक्या रंगाच्या, शक्यतो पांढऱ्या पार्श्वभूमीच्या विरुध्द घेतलेले असावे.<br>• टोपी आणि गडद चष्मा स्वीकार्य नाहीत.<br>• फाईलचा आकार ८०KB-२००KB दरम्यान असावा.<br>• स्कॅन केलेल्या प्रतिमेचा आकार २०० KB पेक्षा जास्त नसावा.<br>• ऑनलाईन अर्ज भरताना उमेदवाराला छायाचित्र, स्वाक्षरी अपलोड करण्यासाठी स्वतंत्र लिंक प्रदान केल्या जातील.<br>• संबंधित लिंकवर क्लिक करा. छायाचित्र/स्वाक्षरी अपलोड करा.<br>• तुमचा फोटो,स्वाक्षरी अपलोड केल्याशिवाय तुमचा ऑनलाईन अर्ज नोंदणीकृत होणार नाही.<br>• छायाचित्रातील चेहरा किंवा स्वाक्षरी अस्पष्ट असल्यास उमेदवाराचा अर्ज नाकारला जाऊ शकतो.<br>• उमेदवाराने हे सुनिश्चित केले पाहीजे की छायाचित्र /स्वाक्षरी अपलोड केल्यानंतर ते योग्य आकाराचे व सुस्पष्ट दिसले पाहीजेत तसेच ते योग्यरित्या अपलोड झालेले आहेत. |
| १०.१३ | स्वाक्षरी<br>• अर्जदाराने काळ्या शाईच्या पेनने पांढऱ्या कागदावर सही करावी.<br>• परिमाण १४० x ६० पिक्सेल (प्राधान्य).<br>• फाईलचा आकार १० KB-२०० KB दरम्यान असावा. स्कॅन केलेल्या प्रतिमेचा आकार २० KB पेक्षा जास्त नाही याची खात्री करा. |
| १०.१४ | कागदपत्रे स्कॅन करणे<br>Document upload size १०० KB to २ MB (Only JPEG, JPG and PDF).<br>दस्ताऐवज अपलोड आकार १०० KB ते २ MB दरम्यान असावा आणि केवळ JPEG, JPG आणि PDF स्वरूपांना परवानगी आहे. |
| १०.१५ | कागदपत्रे अपलोड करण्याची प्रक्रियाः-<br>• ऑनलाईन अर्ज भरताना उमेदवाराला छायाचित्र, स्वाक्षरी अपलोड करण्यासाठी स्वतंत्र लिंक प्रदान केल्या जातील. ऑनलाईन छायाचित्रासाठी (Capture photograph) चे बटन दाबणे आवश्यक आहे.<br>• संबंधित लिंकवर क्लिक करा "छायाचित्र /स्वाक्षरी अपलोड करा.<br>• ऑनलाईन फोटो व स्कॅन केलेला फोटो दोन्ही फोटो अपलोड करणे आवश्यक आहे.<br>* फोटो, स्वाक्षरी, अपलोड केल्याशिवाय ऑनलाईन अर्ज स्विकृत होणार नाही.<br>* सर्व कागदपत्रे अपलोड केल्यानंतर, कॅप्चर केलेला फोटो, अपलोड केलेला फोटो आणि अपलोड केलेली स्वाक्षरी पाहणे अनिवार्य आहे, अन्यथा फॉर्म स्विकृत होणार नाही.<br>१. छायाचित्रातील चेहरा किंवा स्वाक्षरी अस्पष्ट असल्यास उमेदवाराचा अर्ज नाकारला जाऊ शकतो.<br>२. ऑनलाईन अर्जामध्ये छायाचित्र /स्वाक्षरी अपलोड केल्यानंतर उमेदवारांनी प्रतिमा स्पष्ट आहेत आणियोग्यरित्या अपलोड केल्या आहेत हे तपासावे.<br>३. उमेदवाराने हे सुनिश्चित केले पाहिजे की अपलोड करावयाचा फोटो आवश्यक आकाराचा आहे आणि चेहरा स्पष्टपणे दिसला पाहिजे.<br>टिपः ऑनलाईन नोंदणी केल्यानंतर उमेदवारांनी त्यांच्या प्रणालीद्वारे तयार केलेल्या ऑनलाईन अर्जाची प्रिंटआऊट घ्यावी. |
| | |

| | |
|---|---|
| १०.१६ | **अर्ज सादरीकरण**<br>१. सदर अर्ज धर्मादाय आयुक्त यांच्या https://charity.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात येणाऱ्या लिंकव्दारे दिनांक ११/०९/२०२५, वेळ १४:०० पासून भरणेसाठी उपलब्ध होतील.<br>२. उमेदवारांनी परीक्षा शुल्क दिलेल्या पेमेंट गेटवेद्वारे ऑनलाईन पध्दतीने अदा करावे. |
| १०.१७ | **परीक्षा शुल्क**<br>१. खुल्या प्रवर्गाच्या उमेदवारांसाठी रु. १०००/-<br>२. मागास प्रवर्ग व अनाथ उमेदवारांसाठी रु.९००/-<br>३. परीक्षा शुल्क फक्त ऑनलाईन पध्दतीनेच भरणा करण्यात यावे.<br>४. उमेदवारास प्रसिध्द केलेल्या जाहिरातीमधील एकापेक्षा अधिक पदांकरीता अर्ज करावयाचे असल्यास अशा प्रत्येक पदांसाठी स्वतंत्र अर्ज सादर करुन त्यासाठी स्वतंत्र परीक्षा शुल्क भरणे बंधनकारक राहील.<br>५. परीक्षा शुल्क ना परतावा (Non-Refundable) आहे. |
| १०.१८ | वरील कार्यपध्दती ही अर्ज करण्याची योग्य पध्दत आहे. याशिवाय दुसऱ्या पध्दतीने केलेले अर्ज हे अवैध ठरविण्यात येतील. |
| १०.१९ | उमेदवाराने अर्जात स्वतःचे नाव, सामाजिक प्रवर्ग, कोणत्या प्रवर्गातून अर्ज करु इच्छित आहे तो प्रवर्ग, जन्म दिनांक, भ्रमणध्वनी क्रमांत व ई-मेल आयडी इ. माहिती काळजीपूर्वक भरावी. सदर माहिती चुकल्यास त्यास धर्मादाय आयुक्त कार्यालय जबाबदार राहणार नाही. |
| १०.२० | उमेदवाराने अर्जावर केलेली स्वाक्षरी ही त्याच्या प्रवेशपत्रावर / उपस्थिती पत्रकावर एकाच प्रकारची असेल याची दक्षता घ्यावी. तसेच उमेदवाराने ऑनलाईन अर्जावर अपलोड केलेले छायाचित्र वरीलप्रमाणे सर्व ठिकाणी एकच असेल याची दक्षता घ्यावी. |
| १०.२१ | उमेदवाराने ऑनलाईन पध्दतीने सादर केलेल्या अर्जातील तपशिल व ऑनलाईन पध्दतीने सादर केलेली कागदपत्रे / प्रमाणपत्रांच्या आधारे परीक्षेस बसणेस मुभा देण्यात येईल. त्यामुळे उमेदवार संभाव्य निवडसूची क्षेत्रात आला तरी आवश्यक ती शैक्षणिक अर्हता व इतर अर्हता असल्याशिवाय व आवश्यक कागदपत्रांची पूर्तता केल्याशिवाय निवडीस पात्र राहणार नाही. केवळ संभाव्य निवडसूची क्षेत्रात आल्यामुळे उमेदवारास निवडीचा कोणताही हक्क प्राप्त होणार नाही. त्यामुळे उमेदवारांनी पात्रतेच्या अटी अभ्यासूनच अर्ज सादर करावा. |
| १०.२२ | भरती प्रक्रियेच्या संदर्भातील व त्याअनुषंगाने होणाऱ्या बदलाबाबतची सर्व माहिती केवळ धर्मादाय आयुक्तालयाच्या https://charity.maharashtra.gov.in या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध होईल. याव्यतिरिक्त कोणत्याही माध्यमाद्वारे भरती प्रक्रियेची माहिती उपलब्ध होणार नाही, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी. |
| १०.२३ | विहित दिनांकानंतर व विहित वेळेनंतर आलेला कोणताही अर्ज संगणकीय प्रणालीमध्ये स्विकृत केला जाणार नाही. |
| १०.२४ | वय, शैक्षणिक अर्हता, मागासवर्ग/नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र/, दिव्यांग, महिला, माजी सैनिक, अनाथ, प्रकल्पग्रस्त, भूकंपग्रस्त, अंशकालीन कर्मचारी, खेळाडू, अनुभव पात्रता इ. संदर्भात नचूकता अर्जामध्ये स्पष्टपणे/निर्विवादपणे अर्जातील संबंधित रकान्यात स्पष्टपणे दावा करणे आवश्यक आहे. नसल्यास, संबंधित दाव्याचा नंतर विचार केला जाणार नाही. उमेदवाराने अर्ज सादर केल्यानंतर त्यामध्ये कोणत्याही प्रकारचा बदल करता येणार नाही. |
| १०.२५ | ज्या उमेदवारांनी यापूर्वी त्यांचे नाव रोजगार स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्राकडे, सेवायोजन कार्यालय / समाज कल्याण दिव्यांग कल्याण/ जिल्हा सैनिक बोर्ड/ आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी/ कार्यालय इ- कार्यालयात नोंदविलेले आहे, अशा उमेदवारांनी तसेच प्रकल्पग्रस्त, अंशकालीन उमेदवार यांनी देखील स्वतंत्ररित्या अर्ज सादर करणे आवश्यक राहील. |

**११. परीक्षा :-**

| | |
|---|---|
| ११.१ | • जाहिरातीमध्ये नमूद करण्यात आलेल्या प्रत्येक पदासाठी ऑनलाईन परीक्षा वेगवेगळी घेण्यात |

| | |
|---|---|
| | येईल.<br>• परीक्षेसाठी मराठी, इंग्रजी, सामान्य ज्ञान, अंकगणित बुध्दीमत्ता चाचणी व विषयज्ञान या / विषयावर वस्तुनिष्ठ बहुपर्यायी प्रश्न असतील. सदर परीक्षेचा दर्जा हा संबंधित पदाकरीता विहित करण्यात आलेल्या किमान शैक्षणिक अर्हतेनुसार तसेच संबंधित पदासाठी आवश्यक असलेल्या कौशल्य तपासणीस पूरक राहील.<br>• विधि सहायक या पदाकरिता परीक्षेचे गुण २०० व परीक्षेचा कालावधी दोन तास राहील. जे उमेदवार किमान ४५% गुण प्राप्त करतील अशा उमेदवारांमधुन निवडसुची तयार करुन निवडसुचीतील पात्र उमेदवारांची गुणवत्तेनुसार शिफारस करण्यात येईल. विधि सहायक पदाकरीता परीक्षेचा अभ्यासक्रम सोबत जोडण्यात येत आहे.<br>• निरीक्षक व वरिष्ठ लिपिक या पदांकरिता परीक्षेचे गुण २०० व परीक्षेचा कालावधी दोन तास राहील. जे उमेदवार किमान ४५% गुण प्राप्त करतील अशा उमेदवारांमधुन निवडसुची तयार करुन निवडसुचीतील पात्र उमेदवारांची गुणवत्तेनुसार शिफारस करण्यात येईल. निरीक्षक व वरिष्ठ लिपिक पदाकरीता परीक्षेचा अभ्यासक्रम सोबत जोडण्यात येत आहे.<br>• परंतु लघुलेखक उच्चश्रेणी, व लघुलेखक निम्नश्रेणी, या संवर्गाचे परीक्षेचे गुण १२० व परीक्षेचा कालावधी एक तास राहील. तसेच व्यावसायीक चाचणीसाठी ८० गुणांची असेल, व जे उमेदवार परिक्षेत किमान ४५% गुण प्राप्त करतील असे उमेदवारांनाच व्यावसायीक चाचणी देता येईल. परीक्षा व व्यावसायीक चाचणी यामध्ये उमेदवारांनी प्राप्त केलेल्या गुणांच्या आधारे निवडसुची तयार करुन निवडसुचीतील पात्र उमेदवारांची गुणवत्तेनुसार शिफारस करण्यात येईल. लघुलेखक उच्चश्रेणी, व लघुलेखक निम्नश्रेणी पदाकरीता परीक्षेचा अभ्यासक्रम सोबत जोडण्यात येत आहे. |
| ११.२ | जाहिरातीमध्ये नमूद पदाकरिता अर्ज केलेल्या व परीक्षेकरीता पात्र ठरलेल्या उमेदवारांना परीक्षेचे प्रवेशपत्र (Hall Ticket) https://charity.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात येणाऱ्या लिंकव्दारे, परीक्षेच्या ०७ (सात) दिवस अगोदर त्यांच्या व्यक्तिगत प्रोफाइलमध्ये उपलब्ध करून देण्यात येतील. उमेदवारांनी त्यांच्या परीक्षा प्रवेशपत्राची प्रत स्वतः संकेतस्थळावरून प्रिंट करून घ्यावी.<br>• परीक्षेच्या वेळी उमेदवाराने प्रवेशपत्राची प्रिंट व ओळखीचा पुरावा सोबत ठेवणे (छायाप्रतीसह) बंधनकारक आहे. त्याशिवाय कोणत्याही उमेदवारांस परीक्षेस बसण्यास परवानगी दिली जाणार नाही. परीक्षेनंतर प्रस्तुत प्रवेशपत्र स्वतः जवळ जपून ठेवावे व परीक्षा कक्षात प्रवेशपत्र व ओळखीच्या पुराव्याची छायाप्रत जमा करावी. परीक्षा केंद्राची शहरे उपलब्धतेनुसार निश्चित केली जातील. |
| ११.३ | "परीक्षा केंद्र प्रवेश पत्रावर ठरवून दिलेप्रमाणे असतील. अर्जदाराने मागणी केलेल्या केंद्राव्यतिरिक्त अन्य नवीन केंद्र दिले जाऊ शकते, याबाबत उमेदवारांची कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही". |
| ११.४ | दिव्यांग कल्याण आयुक्तालय यांचे दि. २० डिसेंबर २००६ चे परिपत्रकानुसार तसेच शासन परिपत्रक, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, क्रमांक न्यायाप्र-२०१४.क्र.प्र/१.क्र.अ/२ दिनांक १८/०३/२०१४ अन्वये शासनाने जारी केलेल्या आदेशानुसार दृष्टीहीन, अल्पदृष्टी, सेरेब्रल, पल्सी आणि डिस्लेक्मियाने बाधित उमेदवार लिहिण्यासाठी सक्षम नसल्यास परीक्षा प्रयोजनार्थ त्यांच्या मागणीप्रमाणे लेखनिक व अन्य बाबी संदर्भात व्यवस्था करण्यास परवानगी घेता येईल.<br>**लेखनिक वापरणाऱ्या दिव्यांग व्यक्तीसाठी मार्गदर्शक तत्वे-:**<br>दृष्टीहीन उमेदवार आणि उमेदवार ज्यांच्या लेखनाच्या गतीवर कोणत्याही कारणास्तव कायमस्वरूपी प्रतिकूल परिणाम होत आहे, ते ऑनलाईन परीक्षेदरम्यान त्याच्या स्वतःच्या लेखनिकाचा वापर खाली दिलेल्या मर्यादेच्या अधीन राहून करू शकतात.<br>• उमेदवारास त्याच्या/तिच्या स्वखर्चाने स्वतःच्या लेखनिकाची व्यवस्था करावी लागेल व लेखनिकाकडून परीक्षा नियमांचे उल्लंघन होणार नाही याची जबाबदारी घ्यावी लागेल.<br>• उमेदवाराने नेमलेला लेखनिक हा त्याच परीक्षेसाठी उमेदवार नसावा प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर वरील नियमाचे उल्लंघन आढळून आल्यास, उमेदवार आणि लेखनिक या दोघांच्या |

उमेदवारी रद्द केली जाईल. परीक्षेत लेखनिकाच्या सेवांसाठी पात्र असलेल्या आणि वापरू इच्छिणाऱ्या उमेदवारांनी काळजीपूर्वक सूचित केले पाहिजे. त्यानंतरची कोणतीही विनंती स्विकारली जाणार नाही.

- एका उमेदवारासाठी लेखनिक म्हणून काम करणाऱ्या व्यक्तीस दुसऱ्या उमेदवारासाठी लेखनिक म्हणून काम करता येणार नाही.
- लेखनिक कोणत्याही शैक्षणिक प्रवाहातील असू शकतो. तथापि विशेष तज्ञ अधिकाऱ्यांच्या पदांसाठी लेखनिक हा त्या पदासाठी विहित केलेल्या शैक्षणिक प्रवाहातील नसावा. तसेच सदर मदतनीसाची शैक्षणिक पात्रता ही उमेदवाराच्या पदाच्या आवश्यक शैक्षणिक अर्हतेच्या कमीत कमी, एक स्तर कमी असावी.
- उमेदवार आणि लेखनिक या दोघानांही उचित हमीपत्र द्यावे लागेल की लेखनिकाने वर नमूद केलेल्या लेखनिकांसाठी सर्व विहित पात्रता निकषांची पूर्तता केली आहे पुढे जर नंतर असे आढळून आले की त्याने/तिने ठरवून दिलेली कोणतीही पात्रता निकष पूर्ण केले नाही किंवा भौतिक तथ्ये दडवली आहे. तर अर्जदाराची उमेदवारी रद्द केली जाईल.
- जे उमेदवार लेखनिकाचा वापर करतात ते परीक्षेच्या प्रत्येक तासासाठी किंवा अन्यथा सल्ल्यानुसार २० मिनिटांच्या भरपाईच्या वेळेसाठी पात्र असतील.
- लेखनिकाने स्वतःहून उत्तर देऊ नये, असे कोणतेही वर्तन आढळल्यास उमेदवारी रद्द केली जाईल.
- फक्त सवलतीच्या वेळेसाठी नोंदणी केलेल्या उमेदवारांनाच अशी परवानगी दिली जाईल कारण उमेदवारांना दिलेला सवलतीचा वेळ प्रणालीवर आधारित असेल, जर त्यांनी/तिने त्यासाठी नोंदणी केली नसेल तर चाचणी आयोजित करणाऱ्या यंत्रणेला अशी सवलत देणे शक्य होणार नाही. सवलतीच्या वेळेसाठी नोंदणी न केलेल्या उमेदवारांना अशा सवलतीना परवानगी दिली जाणार नाही.
- परीक्षेदरम्यान, कोणत्याही टप्प्यावर, लेखनिक स्वतंत्रपणे प्रश्नांची उत्तरे देत असल्याचे आढळल्यास, संबंधित उमेदवारांचे परीक्षा सत्र समाप्त केले जाईल आणि उमेदवाराची उमेदवारी रद्द केली जाईल. जर परीक्षा पर्यवेक्षकांनी परीक्षेनंतर लेखनिकानेप्रश्नाची स्वतंत्रपणे उत्तरे दिल्याचा अहवाल सादर केल्यास अशा उमेदवारांची उमेदवारी रद्द केली जाईल.
- लोकोमोटर डिसेबिलिटी आणि सेरेब्रल पाल्सी (locomotor disability and cerebral palsy) असलेल्या उमेदवारांसाठी मार्गदर्शक तत्वे लोकोमोटर डिसेबिलिटी आणि सेरेब्रल पल्सी बाबत कार्यक्षमता कमी होण्याच्या मर्यादेपर्यंत (किमान ४०% दिव्यांग) असेल अश्या उमेदवारांसाठी प्रति तास वीस मिनिटे सवलतीची वेळ अनुज्ञेय असेल.

**दृष्टिहीन उमेदवारांसाठी मार्गदर्शक तत्वे** .

- दृष्टिहीन उमेदवारचाचणीसाठी सामग्री वर्धित फॉन्टमध्ये पाहण्याची निवड (मॅग्निफाईड) करू शकतात आणि असे सर्व उमेदवार प्रत्येक तासासाठी २० मिनिटांच्या भरपाई वेळेसाठी पात्र असतील.

जे उमेदवार परीक्षेसाठी लेखनिकाची सेवा वापरतात, परीक्षेतील मजकूर आवर्धित फॉन्टमध्ये पाहण्याची सुविधा दृष्टिहीन उमेदवारांना ही मार्गदर्शक तत्वे वेळोवेळी मार्गदर्शक तत्वे/स्पष्टीकरण, जर काही असतील, त्यानुसार बदलु शकतात.

११.५ ज्या उमेदवारांना परीक्षेच्या दिवशी सहाय्यकाची मदत पुरविण्यात आली आहे. अशा उमेदवारांना सर्व अल्पदृष्टी उमेदवारांना पेपर सोडविण्यासाठी प्रत्येक तासाला २० मिनिटे अतिरिक्त वेळ दिला जाईल तथापि अशा उमेदवाराने परीक्षेच्या वेळी दिव्यांगत्याचे प्रमाण किमान ४०% असल्याबाबतचे मूळ प्रमाणपत्र व त्याची साक्षांकित छायांकीत प्रत सोबत आणणे आवश्यक आहे.

११.६ परीक्षेनंतर आवश्यकतेनुसार संभाव्य निवडसूची क्षेत्रातील उमेदवारांना १:३ या प्रमाणात कागदपत्रे/ प्रमाणपत्रे पडताळणीकरीता बोलाविण्यात येईल.

११.७ काही अपरिहार्य कारणास्तव परीक्षेच्या तारखांमध्ये/परीक्षेच्या ठिकाणामध्ये बदल करावा लागल्यास त्याबाबतची माहिती https://charity.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात

| | |
|---|---|
| | येईल. याबाबत लेखी स्वरूपात कोणत्याही प्रकारे पत्रव्यवहार केला जाणार नाही. |
| ११.८ | • **ओळख पटवणे :-**<br>परीक्षा केंद्रावर प्रवेशपत्रासह उमेदवाराचे ओळख पटवणारे मूळ कागदपत्रासह व उमेदवाराचा अलीकडच्या काळातील फोटो असलेले वैध फोटो ओळखपत्र जसे पॅन कार्ड (Pan card)/ पारपत्र (Passport)/ वाहनचालक परवाना (Driving License)/ मतदार ओळखपत्र (Voter ID)/ आधारकार्ड, बँक पोस्ट फोटोसहीतचे पासबुक / विदयापीठ / शासकीय कर्मचारी ओळखपत्र / /कॉलेजचे फोटोसहीत ओळखपत्र बार कौन्सिलचे ओळखपत्र हे समवेक्षक /पर्यवेक्षकाला सादर करणे आवश्यक आहे. उमेदवाराचे प्रवेशपत्र, हजेरीपत्रक /उपस्थितीपत्रक आणि त्याने सादर केलेल्या कागदपत्रांच्या आधारे उमेदवाराची ओळख पटविली जाईल. जर उमेदवाराची ओळख पटवण्याबाबत काही शंका उपस्थित झाल्यास किंवा ओळख शंकास्पद असल्यास त्याला परीक्षेसाठी उपस्थित राहू दिले जाणार नाही, सदर उमेदवारांचे मूळ प्रवेशपत्र व ओळखपत्राची एक छायाप्रत परीक्षा हॉलमध्ये जमा करणे आवश्यक राहील.<br>**टीप**-: उमेदवाराने परीक्षेला उपस्थित राहताना स्वतःची ओळख पटविण्यासाठीची आवश्यक ती मूळ कागदपत्रे, त्या कागदपत्रांच्या छायांकीत प्रती परीक्षेच्या प्रवेशपत्रासह सादर करणे आवश्यक आहे. परीक्षेच्या प्रवेशपत्रावरील नाव (परीक्षेसाठी नोंदणी केल्यानुसार) सोबत सादर करण्यात येणाऱ्या ओळखपत्राशी तंतोतंत जुळणे आवश्यक आहे. ज्या महिला उमेदवारांच्या पहिल्या/मधल्या/शेवटच्या नावात विवाहानंतर फरक पडला असेल त्यांनी याबाबत विशेष खबरदारी घेणे आवश्यक आहे. सदर महिला उमेदवारांनी नावात बदल झाल्याबाबतचे विवाह नोंदणी प्रमाणपत्र किंवा राजपत्र यापैकी एक पुरावा सादर करणे आवश्यक आहे. परीक्षेचे प्रवेशपत्र व सादर करण्यात आलेले फोटो असलेले ओळखपत्र यामधील नावात कोणतीही तफावत आढळल्यास उमेदवारास परीक्षेला उपस्थित राहू दिले जाणार नाही.<br>**रेशनकार्ड, शिकाऊ वाहन परवाना ओळखपत्र म्हणून ग्राह्य धरला जाणार नाही.**<br>• **निवड प्रक्रिये दरम्यान गैरवर्तणूक गैरप्रकार करताना दोषी आढळलेल्या / अनुचित प्रकार / उमेदवारावर करण्यात येणारी कार्यवाही** -:<br>उमेदवाराने त्याच्या हितासाठी खोटी व चुकीची माहिती / तपशिल देवू नये, खोटी माहिती तथा खोटा तपशिल तयार करून सादर करू नये किंवा कोणतीही माहिती ऑनलाईन अर्ज भरताना दडवून ठेवू नये. जर उमेदवाराने खोटी माहिती तथा खोटा तपशिल तयार करून सादर केला तर उमेदवारास अपातूर ठरविण्यात येईल व योग्य तो फौजदारी गुन्हा दाखल करण्यात येईल. |
| ११.९ | **परीक्षेच्या वेळेत किंवा एकूण निवड प्रक्रियेदरम्यान जर उमेदवाराने,**<br>१. अनुचित प्रकार करणे किंवा<br>२. तोतयेगिरी करणे किंवा तोतयांच्या सेवा वापरणे किंवा,<br>३. परीक्षेच्या ठिकाणी गैरवर्तणूक करणे किंवा परीक्षेच्या पेपरमधील माहिती किंवा तत्संबंधी काही माहिती कोणत्याही कारणासाठी पूर्ण किंवा त्याचा काही भाग तोंडी किंवा लेखी किंवा इलेक्ट्रानिकली किंवा मेकॅनिकली उघड करणे, प्रकाशित करणे, पाठवणे, साठवणे किंवा,<br>४. स्वतःच्या उमेदवारीबद्दल अनियमित किंवा अयोग्य पद्धतीचा अवलंब करणे किंवा,<br>५. स्वतःच्या उमेदवारीबद्दल गैरमार्गाने पाठिंबा मिळविणे किंवा,<br>६. दळणवळणाची भ्रमणध्वनी किंवा तत्सम इलेक्ट्रॉनिक साधने यांचा वापर परीक्षेच्या ठिकाणी करणे,<br>७. परीक्षा कक्षातील परीक्षा नियंत्रण अधिकारी/पर्यवेक्षक/समावेशक यांच्याशी अरेरावी करणे उध्दटपणे वागणे त्याना लाच देऊ पाहणे. अशा कृत्यांमध्ये दोषी आढळल्यास अशा उमेदवारास फौजदारी कार्यवाहीस सामोरे जावे लागेल तसेच सदर उमेदवारास परीक्षेसाठी अपात्र ठरविले जाईल.<br>८. धर्मादाय आयुक्त कार्यालयातर्फे पुढील कालावधीत घेण्यात येणाऱ्या कोणत्याही परीक्षेसाठी |

| | |
|---|---|
| | बसण्यापासून काही ठराविक कालावधीसाठी किंवा कायमचे प्रतिरोधित (Debarred) केले जाईल. |

**१२. परीक्षा केंद्राविषयी नियमावली :-**

| | |
|---|---|
| १२.१ | १. प्रवेश पत्रामध्ये नमूद केलेल्या परीक्षा केंद्रावर "**ऑनलाईन**" पद्धतीने परीक्षा घेतली जाईल.<br>२. परीक्षा केंद्र, परीक्षेचे ठिकाण, दिनांक, वेळ व सत्र इत्यादी बाबत बदल करण्याची विनंती मान्य केली जाणार नाही.<br>३. धर्मादाय कार्यालयास परीक्षा केंद्र रद्द अथवा नवीन केंद्र समाविष्ट इत्यादी बाबतचे अंतिम अधिकार असतील.<br>४. धर्मादाय कार्यालयास उमेदवाराने मागणी केलेल्या परीक्षा केंद्रव्यतिरिक्त केंद्र देण्याचा अधिकार असेल.<br>५. उमेदवारांनी आपल्या जबाबदारीवर स्वखर्चाने परीक्षा केंद्रावर उपस्थित राहावयाचे आहे या संबंधात कोणत्याही प्रकारच्या हानी/नुकसानीस महापालिका जबाबदार राहणार नाही.<br>६. एखादया परीक्षा केंद्रावर पुरेसे उमेदवार "**ऑनलाईन**" परीक्षेसाठी उपस्थित न राहिल्यास किंवा केंद्रावर क्षमतेपेक्षा अधिक उमेदवार झाल्यास धर्मादाय कार्यालयास उमेदवाराचे परीक्षा केंद्र बदलण्याचा अधिकार असेल.<br>७. परीक्षेच्यावेळी परीक्षा केंद्रात किंवा परीक्षा परीसरात भ्रमणध्वनी, गणकयंत्र (Calculator) आयपॅड तत्सम इलेक्ट्रानिक यंत्रे किंवा इतर संपर्काची साधने सोबत बाळगणेस आणि वापरण्यास सक्त मनाई असेल. |

**१३. परीक्षेला उशिरा येण्याबाबत**

| | |
|---|---|
| १३.१ | परीक्षेच्या प्रवेशपत्रात परीक्षेला हजर राहण्यासाठी दिलेल्या वेळेनंतर येणाऱ्या उमेदवारांना परीक्षेला उपस्थित राहू दिले जाणार नाही. प्रवेशपत्रावरील परीक्षेसाठी उपस्थित राहण्याची वेळ ही प्रत्यक्ष परीक्षा सुरू होण्याच्या आधीची असणार आहे. परीक्षेची वेळ ही प्रत्यक्ष परीक्षा सुरू होण्याच्या आधीची असणार आहे. परीक्षेची वेळ जरी २ तास (१२० मिनिटे) असली तरी, उमेदवारांना विविध प्राथमिक औपचारीकता पूर्ण करण्यासाठी जसे की- सूचना देणे, ओळख पटवणे, आवश्यक विविध कागदपत्रांची पडताळणी, आवश्यक कागदपत्रे गोळा करणे, इत्यादी, बार्बीच्या पुर्ततेसाठी प्रवेशपत्रावर नमूद केलेल्या वेळेच्या किमान १ तास आधी परीक्षा केंद्रावर उपस्थित राहणे बंधनकारक आहे. परीक्षेच्या ३० मिनिटे आधी परीक्षा केंद्रावरील प्रवेश बंद करण्यात येणार असल्यामुळे, त्यानंतर येणाऱ्या उमेदवारांना परीक्षेस बसण्यास परवानगी देण्यात येणार नाही. |

**१४. कागदपत्रे पडताळणी वेळेस विहित कागदपत्रे प्रमाणपत्रे सादर करणे-:**

सदर परीक्षेच्या निकालानंतर संभाव्य निवडसूची क्षेत्रातील उमेदवारांना कागदपत्रे पडताळणीसाठी आवश्यकतेनूसार खालील कागदपत्रे प्रमाणपत्रे सादर करणे अनिवार्य (लागू असलेली) आहे.

| |
|---|
| १. अर्जदाराची माहिती बरोबर असल्याचे स्वयंघोषणा पत्र. |
| २. शैक्षणिक अर्हतेबाबतची कागदपत्रे. |
| ३. वयाचा पुरावा. |
| ४. आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील असल्याबाबतचा पुरावा. |
| ५. राखीव प्रवर्गातून निवड झालेल्या उमेदवारांचे संबंधित प्रवर्गाचे जात प्रमाणपत्र (अनुसुचित जमाती प्रवर्गासाठी जात वैधता प्रमाणपत्र अनिवार्य). |
| ६. वैध नॉन-क्रिमिलेयर प्रमाणपत्र. |
| ७. पात्र दिव्यांग व्यक्ती असल्याचा पुरावा. |
| ८. पात्र माजी सैनिक असल्याचा पुरावा. |
| ९. खेळाडूसाठीच्या आरक्षणाकरीता पात्र असल्याचा पुरावा. |

| |
|---|
| १०. अनाथ आरक्षणासाठी पात्र असल्याचा पुरावा. |
| ११. अराखीव महिला,मागासवर्गीय, आदुध, खेळाडू, दिव्यांग, माजी सैनिक, अनाथ आरक्षणाचा दावा असल्यास अधिवास प्रमाणपत्र. |
| १२. विवाहित स्त्रियांच्या नावात बदल झाल्याचा पुरावा. |
| १३. मराठी भाषेचे ज्ञान असल्याचा पुरावा. |
| १४. लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र. |
| १५. महाराष्ट्र राज्याचा अधिवास असल्याबाबतचे प्रमाणपत्र .(डोमिसाईल) |
| १६. पदवीधर/पदविकाधारक अंशकालीन असल्याबाबतचे प्रमाणपत्र (शासन निर्णय क्र. पअंक-१००९/प्र.क्र.२००/२००९/१६-अ, दि. २७/१०/२००९ नुसार. |
| १७. शासन निर्णय मानंम २०१२/प्र.क्र.२७७/३९, दि. ०४/०२/२०१३ मध्ये नमूद प्रमाणे MS-CIT अथवा समकक्ष प्रमाणपत्र. |
| १८. प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्र. |
| १९. भूकंपग्रस्त प्रमाणपत्र. |
| २०. पात्रते संदर्भातील विविध दाव्याच्या अनुषंगाने आवश्यक कागदपत्रे प्रमाणपत्रे इत्यादी. |

**१५. इतर सर्वसाधारण अटी/शर्ती/सूचना -:**

| | |
|---|---|
| १५.१ | उमेदवार हा भारताचा नागरिक असावा आणि महाराष्ट्रात १५ वर्षे अधिवास (domicile) करीत असल्याबाबचे सक्षम प्राधिकरणाचे प्रमाणपत्र (तहसिलदार यांचे कार्यालयाकडील) उमेदवाराकडे असणे आवश्यक आहे. कोणत्याही प्रकारच्या आरक्षणाचा लाभ हा केवळ महाराष्ट्राचे सर्वसाधारण रहिवासी असणाऱ्या उमेदवारांना अनुज्ञेय आहे. सर्वसाधारण रहिवासी या संज्ञेला भारतीय लोक प्रतिनिधित्व कायदा १९५० च्या कलम २० अनुसार जो अर्थ आहे, तोच अर्थ असेल. |
| १५.२ | जातीच्या दाव्याच्या पृष्ठयर्थ महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतरमागास वर्ग व विशेष मागास प्रवर्ग व (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्यांच्या पडताळणीचे विनियम) अधिनियम, २००० मधील तरतूदीनुसार सक्षम प्राधिकारी यांचेकडून प्रदान करण्यात आलेले जातीचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. |
| १५.३ | विमुक्त जाती (अ), भटक्या जमाती (ब), भटक्या जमाती (क), भटक्या जमाती (ड), विशेष मागास प्रवर्ग व इतर मागासवर्गाचा दावा करणाऱ्या (या प्रवर्गातील महिला, खेळाडू, माजी सैनिक, अपंग, अंशकालीन कर्मचारी, स्वातंत्र्यसैनिकांचे पाल्य, प्रकल्पग्रस्त, भूकंपग्रस्त या समांतर आरक्षणाचा दावा करणाऱ्या उमेदवारांनी उन्नत व प्रगत गटामध्ये मोडत आहेत किंवा नाही याबाबत अर्जामध्ये स्पष्टपणे नमूद करणे आवश्यक आहे. |
| १५.४ | परीक्षेचे प्रवेशपत्र, वेळापत्रक, बैठकव्यवस्था, कागदपत्रे पडताळणीसाठी पात्र उमेदवाराची यादी, निवेदने, तात्पुरती निवड व अतिरिक्त निवडसूची, अंतिम निवड व इतर सर्व सूचना वेळोवेळी https://charity.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर तथा संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येणाऱ्या लिंकव्दारे देण्यात येतील. त्याबाबत उमेदवारांना लेखी पत्रव्यवहार केला जाणार नाही. त्यामूळे उमेदवारांनी भरती प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत वेळोवेळी संकेतस्थळावरील सूचना पहाव्यात. संकेतस्थळावरील सूचना पाहिल्या नाहीत या कारणास्तव आलेल्या कोणत्याही तक्रारींची दखल घेतली जाणार नाही. |
| १५.५ | उमेदवारी संदर्भातील कोणत्याही तरतूदी धर्मादाय कार्यालयाकडून कोणत्याही क्षणी पूर्वलक्षी प्रभावाने बदलण्याची शक्यता आहे. सदर बदल आवश्यकतेनुसार निदर्शनास आणण्यात येतील व ते संबंधितांवर बंधनकारक असतील. असे बदल धर्मादाय आयुक्त कार्यालयाच्या संकेतस्थळावर वेळोवेळी प्रसिध्द करण्यात येतील. त्याकरीता उमेदवाराने नियमित धर्मादाय आयुक्त कार्यालयाचे संकेतस्थळाचे अवलोकन करणे त्यांच्या हिताचे राहील. |
| १५.६ | शासनाकडील किंवा खाजगी कंपनीकडील उमेदवाराने सरळसेवा भरती प्रक्रियेत अर्ज सादर केल्यापासून निवड प्रक्रिया संपेपर्यंतच्या काळात घडणारे बदल, उदा. निलंबन, दंड, फौजदारी खटला, केल्यानंतर घडून आलेले बदल न कळविल्यास अशा उमेदवाराची उमेदवारी रद्द करण्यात येईल. |

| | |
|---|---|
| १५.७ | निवड प्रक्रिया सुरू झालेनंतर उमेदवाराची निवड झाल्यावर किंवा नियुक्ती दिल्यानंतर कोणत्याही क्षणी उमेदवाराने अर्जात व परीक्षेचे वेळी दिलेली माहिती अगर बनावट कागदपत्रे सादर केल्याचे किंवा खरी माहिती दडवून ठेवल्याचे निर्देशनास आल्यास, त्या उमेदवारांची उमेदवारी, निवड, नियुक्ती कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल. याबाबत कोणताही पत्रव्यवहार विचारात घेतला जाणार नाही. |
| १५.८ | उमेदवाराने नोकरीसाठी केलेल्या अर्जात नमूद केलेली माहिती ही अंतिम समजण्यात येईल. अर्जातील माहिती बदलाबाबत नंतर कोणत्याही प्रकारचे अर्ज स्विकारले जाणार नाहीत अथवा बदल विचारात घेतले जाणार नाहीत. |
| १५.९ | धर्मादाय कार्यालयाने वेळोवेळी घेतलेले निर्णय उमेदवारांवर बंधनकारक असतील. |
| १५.१० | परीक्षेसाठी उपस्थित राहणाऱ्या उमेदवारांना कोणत्याही प्रकारचा प्रवास खर्च देय राहणार नाही. |
| १५.११ | उमेदवारांनी अर्ज करण्याच्या दिनांकास सेवा प्रवेश नियमावलीतील तरतुदीनुसार शैक्षणिक अर्हता धारण करणे अनिवार्य आहे. |
| १५.१२ | निवड झालेल्या उमेदवाराला नियमित तत्वावर नियुक्तीनंतर महाराष्ट्र शासन सेवेचे सेवा विनियम व अधिनियमातील तरतुदी लागू होतील. |
| १५.१३ | शासन निर्णय माहिती तंत्रज्ञ (सा.प्र.वि.), क्रमांक : मातंस-२०१२/प्र.क्र.२७७/३९, दिनांक ४ फेब्रुवारी २०१३ शासन पुरकपत्र दिनांक ०८ जानेवारी, २०१८ व दिनांक १६ जुलै, २०१८ अथवा महाराष्ट्र शासनाच्या संचालनालयाने वेळोवेळी विहित केलेले संगणक हाताळणी/वापरण्याबाबतचे प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक राहील. |
| १५.१४ | सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन, यांचेकडील आदेश क्र. एस.आर.व्ही.-२०००/प्र.क्र.१७/२०००/२०१२, दि ०१/०७/२००५ नुसार लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र नियुक्तीच्यावेळी सादर करणे बंधनकारक राहील. |
| १५.१५ | उपरोक्त पदावर नियुक्ती झाल्यावर उमेदवाराची वैद्यकीय तपासणी व पुर्व चारित्र्य पडताळणी प्रमाणपत्र सहा महिन्याच्या आत करणे बंधनकारक आहे. |
| १५.१६ | उमेदवारांस मराठी भाषेचे ज्ञान असणे आवश्यक आहेत्यास मराठी लिहीता., वाचता व बोलता येणे आवश्यक आहे. |
| १५.१७ | निवड झालेल्या उमेदवारांना महाराष्ट्र शासन, वित्त विभाग शासन निर्णय क्र. अंनियो-१००५/सेवा-४, दि. ३१/१०/२००५ नुसार नवीन अंशदान निवृत्तीवेतन योजना म्हणजेच परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना (Defined Contribution Pension Scheme) लागू राहील. |

**१६. इतर**

| | |
|---|---|
| १६.१ | भरतीशी संबंधीत सर्व बाबीमध्ये धर्मादाय आयुक्त, यांच्या अधिपत्याखालील स्थापित करण्यात आलेली राज्यस्तरीय निवड समिती यांचा निर्णय अंतिम असेल आणि उमेदवारावर बंधनकारक असेल. या संदर्भात धर्मादाय आयुक्ताव्दारे कोणताही वैयक्तिक पत्रव्यवहार अथवा चौकशी केली जाणार नाही. |
| १६.२ | परीक्षा एकापेक्षा जास्त सत्रात घेतल्यास, सत्रामध्ये वापरल्या जाणाऱ्या वेगवेगळ्या चाचणीच्या काठीण्य-पातळीतील किंचित फरक समायोजित करण्यासाठी विविध संचामधील गुणांकन समतुल्य केले जातील. केंद्राची क्षमता कमी असल्यास किंवा कोणत्याही केंद्रावर किंवा कोणत्याही उमेदवारासाठी काही तांत्रिक व्यत्यय आल्यास एकापेक्षा जास्त सत्र आवश्यकतेनुसार घेण्यात येतील. |
| १६.३ | **सामान्यीकरण प्रक्रिया (Normalisation Method)**<br>एकाच दिवशी, एकापेक्षा जास्त सत्रांमध्ये किंवा अनेक दिवसांत, एकापेक्षा जास्त सत्रांमध्ये परीक्षा घ्यावी लागली तर परीक्षेचा प्रथम दिवस ते अंतिम दिवस तसेच प्रथम सत्र ते अंतिम सत्र याबाबत "सामान्यीकरण प्रक्रिया (Normalisation Method) करण्यात येईल सामान्यीकरण प्रक्रियेचे सुत्र (Normalisation Method Formula) जाहिरातीसोबत जोडण्यात येत आहे. |
| १६.४ | निवड प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर उमेदवाराने चुकीची माहिती प्रदान करणे आणि/ किंवा प्रक्रियेचे उल्लंघन केल्याच्या घटनांमुळे उमेदवार निवड प्रक्रियेतून अपात्र ठरेल आणि त्याला/तिला भविष्यात धर्मादाय कार्यालयाच्या भरती प्रक्रियेस उपस्थित राहण्याची परवानगी दिली जाणार नाही. अशी अपात्रता, नंतर आढळून आल्यास पूर्वलक्षी प्रभावाने उमेदवार अपात्र होईल. |

| | |
|---|---|
| १६.५ | जाहिरातीमध्ये नमूद केलेली शैक्षणिक किंवा तदनुषंगिक अर्हता अर्ज सादर करते वेळी उमेदवाराने धारण करणे अनिवार्य आहे. |

**१७. विशेष सूचना** .

| | |
|---|---|
| १७.१ | धर्मादाय आयुक्त कार्यालयत सादर करण्यात आलेली सर्व कागदपत्रे/अभिलेख ही धर्मादाय आयुक्त अभिलेखाचा भाग होती व शासकीय नियमानुसार वापरण्यात येतील. |
| १७.२ | "जर एखाद्या उमेदवाराने भरतीच्या कोणत्याही टप्प्यावर दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास किंवा अनुचित माध्यमांचा अवलंब केल्याचे किंवा तोतया व्यक्तींची व्यवस्था केल्याचे आढळल्यास त्याला निवडीतून अपात्र ठरविण्यात येईल". |
| १७.३ | शासन सेवेत संबंध असल्याचे भासविणाऱ्या व्यक्ती/ मध्यस्थ/ठग्यांच्या गैरमार्गाने नोकरी मिळवून देण्याच्या आश्वासनापासून सावध राहण्याच्या उमेदवारांना सूचना देण्यात येत आहेत. |
| १७.४ | यापूर्वी सदर पदांसाठी अर्ज केलेल्या उमेदवारांनी या जाहिरातीस अनुसरून पुन्हा नव्याने अर्ज करणे आवश्यक आहे. |
| १७.५ | परीक्षेची वेळ, दिनांक, ठिकाण, परीक्षेचे प्रवेशपत्र (Hall Ticket) याबाबत वेळोवेळी धर्मादाय आयुक्त यांच्या संकेतस्थळावर कळविण्यात येईल, याबाबतची दक्षता स्वतः उमेदवाराने घेणे आवश्यक आहे. |
| १७.६ | प्राप्त अर्जाची संख्या लक्षात घेता परीक्षेची वेळ, दिनांक व ठिकाण यामध्ये बदल होऊ शकतो. यामध्ये बदल होऊ शकतो. याबाबत अर्जदारांची तक्रार विचारात घेतली जाणार नाही. |
| १७.७ | प्रस्तुत परीक्षेच्या आयोजनाच्या दिनांकास अन्य संस्थेची परीक्षा असल्यास उमेदवारास कोणती परीक्षा द्यावयाची आहे; याबाबतचा निर्णय उमेदवाराने स्वतः घेणे आवश्यक राहील. |
| १७.८ | उपरोक्त पदाच्या भरती प्रक्रियेबाबतचे सर्व अधिकार निवड समिती, धर्मादाय आयुक्त कार्यालय यांना असून कोणत्याही टप्प्यावर भरती स्थगित, रद्द किंवा काही बदल करण्याचे अधिकार धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी त्यांचेकडे राखून ठेवले आहेत. |

०१/०३/२५

(अमोघ श्या. कलोती)
धर्मादाय आयुक्त,
महाराष्ट्र राज्य, मुंबई

## लघुलेखक(उ. श्रे.), लघुलेखक(क. श्रे.), निरीक्षक व वरिष्ठ लिपिक या सर्व पदांकरीताच्या परीक्षेचा अभ्यासक्रम.

| अ.क्र. | विषय | घटक व उपघटक |
|---|---|---|
| १ | मराठी | सर्वसामान्य शब्दसंग्रह, वाक्यरचना, व्याकरण, म्हणी व वाक्प्रचार यांचा अर्थ आणि उपयोग तसेच उता-यावरील प्रश्नांची उत्तरे. |
| २ | इंग्रजी | Common Vocabulary, Sentence structure, Grammar, use of Idioms and Phrases & their meaning and comprehension of passage. |
| ३ | बुध्दिमापन चाचणी | उमेदवार किती लवकर व अचुकपणे विचार करू शकतो हे आजमावण्यासाठी प्रश्न. |
| ४ | सामान्य ज्ञान | **१)<u>इतिहास</u>**:- आधुनिक भारताचा विशेषतः महाराष्ट्राचा इतिहास- सामाजिक व आर्थिक जागृती (१८८५-१९४७), महत्वाच्या व्यक्तींचे कार्य, समाज सुधारकांचे कार्य, स्वातंत्र्यपूर्व भारतातील सामाजिक जागृतीतील वर्तमानपत्रे, शिक्षणाचा परिणाम, स्वातंत्र्यपूर्व काळातील इतर समकालीन चळवळी, राष्ट्रीय चळवळी. |
| | | **२)<u>भूगोल</u>** :- महाराष्ट्राच्या भुगोलाच्या विशेष अभ्यासासह-पृथ्वी, जगातील विभाग, हवामान, अक्षांश-रेखांश, महाराष्ट्रातील जमिनीचे प्रकार, पर्जन्यमान, प्रमुख पिके, शहरे, नदया, उदयोगधंदे इ. |
| | | **३)<u>राज्यशास्त्र</u>**:- भारतीय संघ राज्यव्यवस्था, भारतीय राज्यघटना, स्थानिक स्वराज्य संस्था, कार्यकारी मंडळ, न्यायमंडळ व विधीमंडळ इ.- घटना कशी तयार झाली आणि घटनेच्या प्रस्तावनेमागची भूमिका व तत्वे, घटनेची महत्वाची कलमे /ठळक वैशिष्टये, केंद्र व राज्य संबंध, निधर्मी राज्य, |

| | | |
|---|---|---|
| | | मुलभूत हक्क व कर्तव्ये, राज्याच्या धोरणाची मार्गदर्शक तत्वे-शिक्षण, समान नागरी कायदा, स्वतंत्र न्यायपालिका, राज्यपाल, मुख्यमंत्री व मंत्रीमंडळ-कर्तव्ये, अधिकार व कार्य, राज्य विधीमंडळ-विधानसभा, विधानपरिषद व त्यांचे सदस्य, अधिकार, कार्य व कर्तव्ये, विधी समित्या इत्यादी. |
| | | ४)**सामान्य विज्ञान** :- भौतिकशास्त्र(Physics),रसायनशास्त्र (Chemisty), प्राणीशास्त्र (Zoology), वनस्पतीशास्त्र(Botany), आरोग्यशास्त्र(Hygiene) |
| | | ५)**चालू घडामोडी**:- जागतिक तसेच महाराष्ट्रासह भारतातील. |

- **Syllabus for Reasoning Test**

| Sr. No. | Item |
|---|---|
| 1 | Analogies |
| 2 | Similarities and Differences |
| 3 | Spatial Visualization |
| 4 | Spatial Orientation |
| 5 | Visual Memory |
| 6 | Discrimination |
| 7 | Observation |
| 8 | Relationship Concepts |
| 9 | Arithmetical Reasoning and Figural Classification |
| 10 | Arithmetic Number Series |
| 11 | Non-Verbal Series |
| 12 | Coding and Decoding |

०३/०३/२५.
(अमोघ श्या. कलोती)
धर्मादाय आयुक्त,
महाराष्ट्र राज्य, मुंबई

# सरळसेवेने विधि सहायक (गट –ब) (अराजपत्रित) पद भरण्यासाठी परीक्षेकरीता अभ्यासक्रम

| अ.क्र. | विषय |
|---|---|
| 1. | The Constitution of India,1950 |
| 2. | The Maharashtra Public Trust Act, 1950 |
| 3. | The Maharashtra Public Trust Rules, 1951 |
| 4. | The Societies Registration Act,1860 and Maharashtra societies Registration Rules, 1971 |
| 5 | The Code of Civil Procedure , 1908 |
| 6. | The Bhartiya Nagarik Suraksha Sanhinta , 2023 |
| 7. | The Bhartiya Saksha Adhiniyam, 2023 |
| 8. | Administrative Tribunal Act, 1985 |
| 9. | Transfer of Property Act, 1882 |
| 10. | Interpretation of Statutes |
| 11. | The Bhartiya Nyaya Sanhita , 2023 |
| 12. | The Maharashtra Land Revenue Code , 1966 |
| 13. | The Indian Contract Act , 1872 |
| 14. | The Indian Trust Act , 1882 |
| 15. | The Limitation Act, 1963 |
| 16. | The Provincial Small Cause Court Act, 1887 |
| 17. | The Presidency Small cause Court Act,1882 |
| 18. | The Maharashtra Right to Public Services Act,2015 |
| 19. | Contempt of Courts Act ,1971 |
| 20. | The Sexual Harassment of Women at Workplace (Prevention, Prohibition And Redressal) Act, 2013 |
| 21. | The Minimum wages Act ,1948 |
| 22. | The Right to Information Act, 2005 |
| 23. | The Maharashtra Public Record Act, 2005 |
| 24. | Prevention of Delay in Discharge of Official Duties Act,2005 |
| 25. | Maharashtra Civil services (Conduct) Rules, 1979 |
| 26. | Maharashtra Civil services (Leave) Rules, 1981 |
| 27. | Maharashtra Civil services (Discipline and Appeal) Rules, 1979 |
| 28. | The Maharashtra Civil Services (Pay)Rules,1981 |
| 29. | The Maharashtra Civil Services (General Conditions of Services) Rules 1981 |

| | |
|---|---|
| 30. | The Maharashtra Civil Services (Joining Time, Foreign Service and Payments during suspension , Dismissal and Removal)) Rules, 1981 |
| 31. | The Maharashtra Civil Services (Pension) Rules, 1982. |
| 32. | The Maharashtra Administrative Tribunal (Procedure) Rules ,1988 |
| 33. | The Maharashtra Civil Services (commutation of Pension )Rules ,1984 |
| 34. | The Maharashtra Civil Services (Regulation of Seniority)Rules, 1982 |
| 35. | The Maharashtra Civil Services (Revised Pay) Rules, 1998. |

०१/०३/२५

(अमोघ श्या. कलोती)
धर्मादाय आयुक्त
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

# Mean Standard Deviation Method

$$\hat{M}_{ij} = \frac{\bar{M}_t^g - M_q^g}{\bar{M}_{ti} - M_{iq}}(M_{ij} - M_{iq}) + M_q^{gm}$$

Where:

$\hat{M}_{ij}$ = Normalized marks of $j^{th}$ candidate in the $i^{th}$ shift.

$\bar{M}_t^g$ = is the average marks of the top 0.1% of the candidates considering all shifts (number of candidates will be rounded-up).

$M_q^g$ = is the sum of mean and standard deviation marks of the candidates in the examination considering all shifts.

$\bar{M}_{ti}$ = is the average marks of the top 0.1% of the candidates in the $i^{th}$ shift (number of candidates will be rounded -up).

$M_{iq}$ = is the sum of mean marks and standard deviation of the $i^{th}$ shift.

$M_{ij}$= is the actual marks of obtained by the $j^{th}$ candidate in the $i^{th}$ shift.

$M_q^{gm}$= is the sum of mean marks of candidates in the shift having maximum mean and standard deviation of marks of candidates in the examination considering all shifts.

Calculation of marks will be done up to 5 decimal places.